cmyk

## संपादकीय

### राजकीय पक्षांचे नैतिक अध:पतन

ज्या छत्रपती शिवरायांनी अठरापगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्य व सुराज्याचे स्वप्न पूर्ण केले त्याच महाराजांच्या महाराष्ट्रात आज जे राजकीय अध:पतन पहायला मिळतेय ते जनतेसाठी अत्यंत क्लेशदायकच आहे. मात्र, यासाठी कोणा एका पक्षाला वा नेत्याला जबाबदार कसे ठरवणार? हा प्रश्नच आहे. कारण सगळ्याच राजकीय पक्षांमध्ये अशा नैतिक अध:पतनाच्या निचांकी पातळी गाठण्यासाठी उत्साहाने कार्यरत टोळ्यांचाच बोलबाला आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### तीन नव्या वंदे भारत ट्रेन सुरू

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.३१) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यावेळी बोलत असताना ते म्हणाले, वंदे भारत गाड्यांचा विस्तार हा आधुनिकता आणि गतीसह विकसित भारताच्या ध्येयाकडे आपल्या देशाची प्रगती दर्शवितो. या तिन्ही ट्रेन मेरठ – लखनौ, मदुराई – बेंगळुरू आणि चेन्नई – नागरकोइल दरम्यान धावतील. चेन्नई–नागरकोइल मार्गावर, विद्यार्थी, शेतकरी आणि आयटी व्यावसायिकांना याचा फायदा होणार आहे. जिथे जिथे वंदे भारतची सुविधा पोहोचली आहे तिथे पर्यटकांची संख्या वाढली आहे, असे मोदी म्हणाले. रोजगाराच्या नवीन संधीही निर्माण होत आहेत, विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दक्षिणेकडील राज्यांचा जलद विकास महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१३१ | रविवार दि.०१ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# तुमची लेक तुमच्या सोबत!



## कुस्तीपटू विनेश फोगाट पोहचली शेतकऱ्यांच्या आंदोलनात

### सुप्रीम कोर्टात सुनावणी

हमीभाव कायद्यासह इतर प्रमुख मुद्द्यांसाठी १३ फेब्रुवारीपासून शेतकरी शंभू सीमेवर ठाण मांडून बसले आहेत. तर शेतकऱ्यांनी दिल्ली चलोची घोषणा करताच हरियाना पोलिसांनी शंभू सीमा बंद केली. ती अद्यापही बंद असून शंभू सीमा उघडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. आता या प्रकरणी २ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार असून न्यायालयाने हरियाना–पंजाब पोलिसांना शेतकऱ्यांशी चर्चा सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

### आंदोलनाला २०० दिवस तरीही दखल नाही – पंढेर

**आंदोलनाला २०० दिवस पूर्ण झाल्यावरून संयुक्त मजूर मोर्चाचे नेते श्रवण सिंह पंढेर यांनी, केंद्र सरकारच्या वेळ काढूपणावरून टीका केली आहे. यावेळी पंढेर म्हणाले, केंद्र सरकारने आमच्या मागण्या अद्याप पूर्ण केलेल्या नाहीत. आम्ही आमच्या मागण्या पुन्हा एकदा सरकारसमोर मांडू. आंदोलनाला २०० दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शेतकरी मोठ्या संख्येने जमले असून आंदोलन करत आहेत.**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**हरियानाच्या शंभू सीमेवर १३ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या आंदोलनास शनिवारी (ता.३१) २०० दिवस पूर्ण झाले. यानिमित्ताने येथे शेतकरी मोठ्या संख्येने जमले होते आणि यांवेळी महापंचायतींचे आयोजन करण्यात आले. यादरम्यान, ऑलिम्पिक महिला कुस्तीपटू विनेश फोगाट शंभू सीमेवर पोहचली. विनेशचा येथे शेतकऱ्यांकडून सत्कार करण्यात आला. दरम्यान, आंदोलनास २०० दिवस पूर्ण झाल्यासह हरियाणा निवडणुकीसंदर्भात शेतकरी नेते महापंचायती घेणार असून. त्यात विनेश फोगटही सहभागी होणार असल्याचे बोलले जात आहे**

यावेळी विनेश म्हणाली, हरियाणाच्या शंभू सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत. या आंदोलनाला २०० दिवस झाले. शेतकऱ्यांना आंदोलनावर बसलेले पाहून वाईट वाटत आहे. शेतकरी देखील या देशाचे नागरिक असून ते देश चालवतात. त्यांच्याशिवाय काहीही शक्य नाही, अगदी खेळाडूंनाही नाही. तुम्ही तुमच्या हक्कासाठी, न्यायासाठी इथे आहात. हिंमत सोडू नका, तुमची मुलगी तुमच्या बरोबर उभी आहे. तसेच सरकारला विनंती करते की, प्रत्येक वेळी उठणारा आवाज हा राजकीयच असतो असे पान २ वर

## पुढील तीन दिवस पावसाचे!

### काही जिल्ह्यांना यलो अलर्ट

**पुणे । पतिनिधी**

**मान्सून ट्रफ त्याच्या सामान्य स्थितीच्या दक्षिणेकडे आहे. बंगालच्या उपसागरात एक वादळी प्रणाली निर्माण झाली आहे. ही वादळी प्रणाली उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशा दरम्यान शनिवारी मध्यरात्री धडकण्याची शक्यता आहे. याच्या प्रभावामुळे मध्य आणि उत्तर द्वीपकल्पीय भारतात पुढील ३–४ दिवस मुसळधार पाऊस पडेल,'' अशी माहिती हवामान विभागाच्या शास्त्रज्ञ सोमा सेन रॉय यांनी दिली.**



असना चक्रीवादळ भारतीय किनारपट्टीपासून दूरवर गेले असून, ते ईशान्य आणि लगतच्या वायव्य अरबी समुद्रावर घोंघावत आहे. पश्चिम मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागरावरील उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनाऱ्यावरील वादळी प्रणाली (डिप्रेशन) शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास उत्तर आंध्र प्रदेशच्या कलिंगपट्टनमजवळ धडकण्याची शक्यता असल्याचे हवामान पान २ वर

## सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी आज बीडमध्ये भव्य नोकरी मेळावा

### संधी मिळवण्यासाठी युवक–युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे–अनिल जगताप

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात प्राधान्याने पुढाकार घेऊन समाजसेवेचे तप करत आलेले शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीडमधील सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे भविष्य उज्वल करण्यासाठी भव्य नौकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. यामुळे निश्चितच येणाऱ्या काळात हजारो तरुणांना लाभ होणार असून हजारो कुटुंबांना एक मजबूत आधार मिळणार आहे. बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने बीडमधील युवक युवतींसाठी आज दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० ते सायं ६.०० वाजेपर्यंत माँ वैष्णव पॅलेस, बीड येथे भव्य नोकरी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मेळाव्यात महाराष्ट्रातील ५० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांचा सहभाग असणार आहे. मेळाव्यास उपस्थित प्रत्येक उमेद्वरास १०० % नोकरीची संधी प्राप्त होणार असून निवड झालेल्या उमेदवारांना तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. विविध नामांकित कंपन्यांमधून ऑन द जॉब ट्रेनिंगची रोजगार संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. नौकरीची संधी प्राप्त करण्यासाठी शैक्षणिक पात्रता आठवी ते उच्च शिक्षण आणि लाभार्थी पात्रता १८ ते ३० वयोगटापर्यंत असणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक उमेदवाराकडे नोंदणी अर्ज आणि बायोडाटा असणे आवश्यक आहे असे शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

बीडमधील तरुण वर्ग नौकरीसाठी कायम भटकंती करताना दिसून येतो. मात्र अनेक ठिकाणी प्रयत्न करून सुद्धा पात्रता असताना देखील नौकरीची संधी प्राप्त होत पान २ वर



## स्व.विनायक मेटे यांना उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार

### मुंबईत ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते होणार वितरण

**बीड । प्रतिनिधी**



राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या वतीने सन २०२० –२१ करिता महाराष्ट्र विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू पुरस्कारासाठी कै. विनायक मेटे यांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार स्विकारण्यासाठी त्यांच्या पत्नी डॉ. ज्योतीताई मेटे यांना निमंत्रित करण्यात आले असून दि. ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रोपती मुर्मु यांच्या हस्ते मुंबई येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

दरवर्षी राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने हे पुरस्कार देण्यात येतात. उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण या साठी हे पुरस्कार देण्यात येत असून कै. विनायक मेटे यांना विधान परिषद सदस्य म्हणून पान २ वर

## बीडमधील कुंटणखान्याचा पर्दाफाश; सहा महिलांची सुटका

### दोघांवर गुन्हा दाखल; अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष व बीड ग्रामीण पोलिसांची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

शहरात अनेकदा कुंटणखान्यावर धाड टाकून महिलांची सुटका करण्यात आलेली आहे. तरीही काही भागात हा प्रकार सुरुच असतो. कल्याणनगर भागात शनिवारी धाड टाकून अशाच एका कुंटणखान्याचा पर्दाफास केला आहे. यावेळी बाहेर जिल्ह्यातील ६ महिलांची सुटका करण्यात आली असून याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही पान २ वर



## राजस्थानी मल्टीस्टेटच्या संचालकाला पुण्यातून अटक

**परळी । प्रतिनिधी**

**ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरण ताजे असतानाच आता राजस्थानी मल्टीस्टेट घोटाळ्यासंदर्भात बीड आर्थिक गुन्हा शाखेने मोठी कारवाई केली. राज्यस्थानी मल्टीस्टेटचा संचालक अभिषेक बियाणीला पुण्यातून बीडच्या आर्थिक गुन्हे शाखेने आज पहाटे ताब्यात घेतले आहे.**

मागच्या अनेक महिन्यांपासून मल्टिस्टेट प्रकरणातील आरोपी बीड पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी ठरत होते. अनेक तक्रारीनंतर आर्थिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. आता राजस्थानी मल्टीस्टेट प्रकरणातील तपासला वेग येणार आहे. लातूर, परळी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यात गुन्हे दाखल झाले आहेत. बीड मधील राजस्थानीसह ज्ञानराधा, जिजाऊ यासह अनेक मल्टीस्टेटमध्ये गुंतवणूकदारांचे पैसे अडकले आहेत. बीड जिल्ह्यातीलच ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये ठेवी अडकल्यानंतर बँकेचे उपाध्यक्ष यशवंत कुलकर्णीला पुण्यातून अटक झाली होती. दरम्यान, शनिवारी राजस्थानी मल्टीस्टेट संदर्भात पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १.५० क्विंटल | २,६२१ | २,६२१ | २,६२१ |
| ज्वारी/हायब्रिड : ३४.०० क्विंटल | २,२०० | २,५६० | २,३५१ |
| मूग : ५१.५० क्विंटल | ६,३०० | ८,२६१ | ७,६९० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ३२.०० क्विंटल | ७,१०० | ८,११० | ७,६८२ |
| बाजरी:४.००क्विंटल | २,३७० | २,५९२ | २,४८१ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १५.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |



## ..तर एमपीएससीलाही भ्रष्टाचार, पेपरफुटीची भीती–जयंत पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

एमपीएससीत सरकारी हस्तक्षेप वाढत असल्याने एमपीएससीची स्वायत्तता धोक्यात असल्याचे वृत काही वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्ध झाले. यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारी हस्तक्षेप वाढल्याने एमपीएससीलाही भ्रष्टाचार, पेपरफुटीची कीड लागेल अशी भीती व्यक्त केली.

जयंत पाटील यांनी आपल्या एक्स हँडलवरून ही प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले की, आधी एमपीएससी परीक्षांमध्ये पान २ वर

## अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून पत्नीचा खून!

**केज । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील शेतात एका महिलेचा चारित्र्याच्या संशया वरून खून झाला असून हा खून तिच्या नवऱ्यानेच केला आहे. खून करून तो पळून जात असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.**

केज तालुक्यातील नागझरी येथील सुवर्णा आणि विलास आघाव हे पती–पत्नी हे सारणी (आनंदगाव) येथे सालगडी म्हणून एका शेतात काम करीत होते. दि. ३१ ऑगस्ट रोजी आंनदगाव (सारणी) ता. केज येथील शेतात आज दुपारी विलास नामदेव आघाव रा. नागझरी पान २ वर

# रेशनकार्डवर आता तांदळाऐवजी मिळणार वस्तू!



### केंद्राचा मोठा निर्णय; गव्हासोबत डाळी, साखर, मीठ, तेल, मैदा, सोयाबीन आणि मसालेही

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**केंद्र सरकार देशातील गरजूंना रेशनकार्डद्वारे रेशन देते. यामध्ये शिधापत्रिकाधारकांना मोफत तांदूळ दिला जातो, मात्र त्यात मोठा बदल करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मोफत तांदूळ देण्याऐवजी आता इतर ९ वस्तू देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.**

केंद्र सरकारकडून देशातील नागरिकांसाठी अनेक योजना राबवल्या जातात. यातील बहुतांश योजना गरीब आणि गरजू लोकांसाठी आहेत. रेशन कार्डधारकांना मोफत रेशन योजनेंतर्गत रेशनही पुरविले जाते. मोफत रेशन योजनेअंतर्गत जवळपास ९० कोटी लोकांना मोफत रेशन दिले जाते. यामध्ये लोकांना पूर्वी मोफत तांदूळ दिला जात होता. मात्र आता यात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार रेशनवरील मोफत तांदूळ बंद करण्यात येणार आहे. त्याऐवजी इतर ९ जीवनावश्यक वस्तू मिळणार आहेत. यामध्ये गहू, डाळी, हरभरा, साखर, मीठ, मोहरीचे तेल, मैदा, सोयाबीन आणि मसाले यांचा समावेश आहे. लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांच्या आहारातील पोषणाची पातळी वाढविण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. यामुळे लोकांचे जीवनमानही सुधारेल, अशी सरकारला आशा आहे.

cmyk

अग्रलेख

# राजकीय पक्षांचे नैतिक अध:पतन

ज्या छत्रपती शिवरायांनी अठरापगड जातीच्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्य व सुराज्याचे स्वप्न पूर्ण केले त्याच महाराजांच्या महाराष्ट्रात आज जे राजकीय अध:पतन पहायला मिळतेय ते जनतेसाठी अत्यंत क्लेशदायकच आहे. मात्र, यासाठी कोणा एका पक्षाला वा नेत्याला जबाबदार कसे ठरवणार? हा प्रश्नच आहे. कारण सगळ्याच राजकीय पक्षांमध्ये अशा नैतिक अध:पतनाच्या निचांकी पातळी गाठण्यासाठी उत्साहाने कार्यरत टोळ्यांचाच बोलबाला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट येथे अवघ्या आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेला छत्रपती शिवरायांचा पुतळा जमीनदोस्त झाला आणि राज्यातलाच नव्हे तर देशातला व जगातलाही प्रत्येक शिवप्रेमी भावविवश व संतप्त झाला. खरं तर उठता-बसता छत्रपतींचे नाव घेणाऱ्या महाराष्ट्रातल्या व केंद्रातल्याही सत्ताधाऱ्यांनी त्वरित यासाठी जाहीर माफी मागायला हवी होती व दोषींवर कडक कारवाई करण्यासाठी तातडीने पावले उचलायला हवी होती. मात्र, प्रत्यक्षात घडले काय? सत्ताधारी या प्रकरणी जबाबदारी झटकण्याचा व दुसऱ्याकडे बोट दाखविण्याचाच प्रयत्न करताना दिसले. मग साहजिकच विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली. या घटनेवर राजकारण नको म्हणत सत्ताधाऱ्यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली. आणि याच गलिच्छ राजकारणाचा कळसाध्याय प्रत्यक्ष घटनास्थळी घडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री राहिलेल्या नारायण राणे व त्यांच्या पुत्रांनी राजकोट येथे आलेल्या आदित्य ठाकरेंची वाट रोखली. साहजिकच त्यावरून तणाव वाढला आणि दोन्ही बाजूंचे समर्थक आक्रमक होऊन एकमेकांना भिडले. नारायण राणे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने खरं तर हा सगळा प्रकार थांबवायला हवा होता. मात्र, कितीही ज्येष्ठपणा मिळाला तरी 'मूळ स्वभाव जाईना'चे दर्शन त्यांनी महाराष्ट्राला व देशाला घडवले व 'घरात घुसून मारण्याच्या' धमक्या दिल्या गेल्या. पत्रकारांना दमदाटी करण्यात आली. हा प्रकार एवढा किळसवाणा होता की, राज्याच्या व केंद्रातल्या भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांनी नारायण राणे व त्यांच्या पुत्रांना या प्रकाराबद्दल चांगले खडसवायला व त्यांच्यावर पक्षांतर्गत कारवाई करायला हवी होती. मात्र, हे करणे तर दूरच उलट 'नारायण राणेंची ही बोलण्याची स्टाईलच आहे,' असे म्हणत उपमुख्यमंत्री व भाजपचे महाराष्ट्रातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस यांनी नारायण राणे यांची पाठराखण केली. हे पाहता या मंडळीला छत्रपती शिवरायांचे नाव घेण्याचाही नैतिक अधिकार शिल्लक राहिला आहे का? असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय रहात नाही. या सगळ्या किळसवाण्या घटनाक्रमावरून पुरती छी:थू झाल्यावर चार दिवसांनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाग आली व त्यांनी घडलेल्या घटनेबाबत माफी मागत या प्रकरणाच्या चौकशीसाठी व नवा पुतळा उभारण्यासाठी संयुक्त अशा दोन समित्यांची स्थापना करण्याची घोषणा केली. पुतळा नौदलाने उभारला होता व ताशी ४५ कि.मी. वेगाने वारे सुटले म्हणून तो कोसळला असे सांगत पहिल्या दिवशी घडल्या घटनेतून अंग काढून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारला चार दिवसांच्या किळसवाण्या राजकीय धुळवडीपूर्वी महाराष्ट्राची व तमाम शिवप्रेमींची नम्रतापूर्वक माफी मागण्याचा शहाणपणा का सुचला नाही? राज्यातील सत्ताधाऱ्यांनी हा शहाणपणा दाखविला असता तर पुतळा प्रकरणावरून राज्यात जे राजकीय अध:पतनाचे अनेक अंक घडले ते घडले नसते आणि सत्ताधाऱ्यांना विरोधी पक्षांना राजकारण नको, असे आवाहन करण्याची वेळही आली नसती. मात्र, उठता-बसता छत्रपतींचे नाव घेऊन आपल्या राजकीय पोळ्या भाजून घेणाऱ्या राजकीय नेत्यांनी महाराजांचा नैतिक सत्ताकारणाचा एकही गुण लक्षात न ठेवल्याने छत्रपती शिवरायांच्या या महाराष्ट्रावर नैतिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय अध:पतन उघड्या डोळ्यांनी पाहण्याची वेळ आली आहे. या तुलनेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रकरणावरून महाराष्ट्राची माफी मागण्याचा जो प्रांजळपणा दाखवला तो योग्यच! मात्र, त्यांच्या या कृतीचे कौतुक करण्यापूर्वीच त्यांच्या पक्षाने सत्तेत राहून या प्रकरणी आंदोलन करण्याचे आक्रित घडवले. त्यामुळे माफी मागण्यामागे अजितदादांचा प्रांजळपणा आहे की, यातून स्वत:ला व आपल्या पक्षाला जनतेच्या रोषातून वाचविण्याची ही राजकीय खेळी आहे? असा प्रश्न निर्माण होतो.

# उमेदवारी मिळाल्यास तन-मन धनाने पाठीशी उभे राहू

## ॲड.नरसिंह जाधव यांना गावागावातून मिळतोय लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा

पाटोदा । प्रतिनिधी

**शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लिगल सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाड्याचे प्रमुख ॲड. नरसिंह जाधव हे आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवू इच्छित असून, त्यासाठी गेल्यावर्षभरापासून ते मतदार संघातील आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गावागावात सर्व लोकांच्या भेटी घेत आहेत. आपण विधानसभा निवडणुकीला शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यास निवडणूक लढविणार असल्याचे ते बोलून दाखवीत आहेत, यावेळी लोकांकडूनही त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आपल्यासारख्या सुशिक्षित आणि उच्चविद्याभूषित नव्या तरुण नेतृत्वाला उमेदवारीचे संधी मिळत असेल तर आम्हीही तण मन धनाने आपल्या पाठीशी उभे राहू असा शब्द देत आहेत.**



राज्यात नोव्हेंबर महिन्यामध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणूक सर्वत्र इच्छुक उमेदवारांची धामधूम सुरू असून आष्टी मतदारसंघातही सर्वच पक्षांकडून उमेदवारीसाठी इच्छुक असल्याने उमेदवार मतदार संघात गावागावातून दौरे करून लोकांच्या भेटीगाठी घेत आहेत. आष्टी मतदार संघात शरद पवारांना मानणारा मोठा वर्ग आहे. यामध्ये पाटोदा तालुक्याचे भूमिपुत्र आणि शरद पवारांचे कट्टर समर्थक म्हणून बीड जिल्ह्यात ओळख असलेले पाटोदा पंचायत समितीचे सभापती राहिलेले स्व. ॲड. लक्ष्मणराव जाधव यांचे सुपुत्र आणि उच्च न्यायालयातील ॲड. नरसिंह जाधव हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून, त्यांनी गेल्या वर्षभरापासून मतदार संघातील गावागावांमध्ये दौरे सुरू केले आहेत. गेल्या दोन दिवसापासून पाटोदा तालुक्यातील गावा गावात जाऊन नागरिकांच्या भेटी घेत आहेत.ॲड. जाधव यांनी पाटोदा तालुक्यातील बेन्सुर, तांबाराजुरी, मंगेवाडी, बेलेवाडी, मंजिरी, पाटोदा शहर,वैद्यकिन्ही,ढाळेवाडी, शिरुर कासर शहर, तसेच इतर गावात दौरा केला. तालुक्यातील बऱ्याच गावातील नागरिकांकडून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. तसेच आपल्यालां म्हणजेच ॲड. नरसिंह जाधव यांच्या रूपाने पाटोदा तालुक्यात उमेदवारी मिळाल्यास आम्ही गावकरी तालुकावादावर आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास यावेळी बोलताना व्यक्त केला. पाटोदा तालुक्यातील पहिल्यांदा किमान उमेदवारी मागण्यासाठी इच्छुक असल्याचे पाहून लोकातही ॲड. जाधव यांचे कौतुक होत आहे. तुम्ही उमेदवार म्हणून आल्यास सर्व मतभेद बाजूला ठेवून आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील नागरिक व्यक्त करीत असून, पाटोदा तालुक्याला उमेदवारीची संधी मिळावी, अशा प्रकारेचे ठरावही गावागावातून ॲड. जाधव यांना उमेदवारी मिळवण्यासाठी दिले जात आहेत.

# अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणारा आरोपी अटक

जालना। प्रतिनिधी

**अवैधरीत्या गावठी पिस्टल बाळगणार्या एकास चंदनझिरा पोलिसांनी जेरबंद केलय. प्रेम गायकवाड असं संशयित आरोपीचं नाव आहे. जालन्याच्या पाटणी फॉर्म शेजारी सिध्दीविनायक कमानिजवळ एक जण त्याच्या जवळ गावठी पिस्टल बाळगून असल्याची माहिती चंदनझिरा पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी सदर ठिकाणी जावुन प्रेम गायकवाड या सांशयिताची अंग झडती घेतली असता त्याच्या जवळ पोलिसांना अवैधरित्या बळगलेली गावठी पिस्टल मिळाली. पोलिसांनी सदर व्यक्तीस ताब्यात घेऊन त्याच्या जवळील पिस्टल जप्त केली.**

दिनांक ३० शुक्रवार रोजी संध्याकाळी ०८.०० वा सुमारास पोलीस निरीक्षक श्री सम्राटसिंग राजपुत यांचे आदेशाने पोउपनि सचिन सानप पोहेकॉ देशमुख पोहेकॉ राजेंद्र पवार हे पट्रोलींग करत असतांना पोउपनि सानप यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम पाटनी फॉर्म शेजारी सिध्दीविनायक कमानिजवळ जालना येथे प्रेम गायकवाड नावाचा इसम पिवळे टि शर्ट व जिन्स पॅन्ट वर उभा असुन त्याचे जवळ गावठी पिस्टल असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन नमुद वर्णनाच्या इसमास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रेम बबन गायकवाड वय-२८ वर्षे रा. शिवनगर घाटी रोड जालना असे असल्याचे सांगीतले तेंव्हा त्यास छापा कार्यवाहीचा उद्देश कळवुन त्याची पंचा समक्ष अंग झडती घेतली त्याचे कमरेला गावठी पिस्टल मॅग्झीनसह मिळुन आले. सदर पिस्टल जागीच पंचनामा करुन पोउपनि सानप यांनी जप्त करुन पोस्टे चंदनझिरा येथे दिलेल्या फिर्यादी वरुन सदर प्रकरणात गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ जारवाल हे करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, मा.अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपानी मा. उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी साहेब यांचे मागदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपुत, पोलीस उप निरीक्षक सचिन सानप, पोहेकॉ देशमुख पोहेकॉ राजेंद्र पवार यांनी केली असुन प्रकरणी तपास सुरु आहे.

# जेईएस महाविद्यालयात ललित कला अकादमीचे उद्घाटन

जालना। प्रतिनिधी

**येथील जेईएस महाविद्यालच्या ललित कला अकादमीचे उद्घाटन सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायक पंडीत विश्वनाथ ओक आणि विश्वनाथ दाशरथे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या प्रसंगी पंडीत विश्वनाथ दाशरथे यांच्या संगीत मैफीलीने जालनेकर रसिकांना मंत्रमुग्ध केले.**

शहरातील जेईएस महाविद्यालयात आयोजित जेईएस ललित कला अकादमीचा उदघाटन समारंभ आणि संगीत मैफीलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया हे होते. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, गायक पंडित विश्वनाथ ओक, पंडीत विश्वनाथ दाशरथे, डॉ. मोहिनी रायबागकर, मराठी विभागाचे प्रमुख तथा समन्वयक डॉ. यशवंत सोनुने, लोककला विभागाचे प्रमुख प्रा. कल्याण उगले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी ललित कला अकादमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करेल. आजच्या युवकांच्या मनामनात संगीत,नाट्य नृत्याची आवड निर्माण व्हावी. त्यांना जीवनात चांगल्या गोष्टीचा छंद असेल तर सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी यासाठी सांस्कृतिक वातावरण देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न ललित कला अकादमीच्या माध्यमातून होणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या उद्घाटनपर भाषणात पंडीत विश्वनाथ ओक म्हणाले की , की पूर्वीच्या काळी संगीताला राजाश्रय होता. परंतु आता परिस्थिती बदलली असल्याचे सांगून संगीत हे आत्मीय आनंदासाठी असायला हवे. संगीत विषयाचा अभ्यास करण्यापेक्षा 'रियाज' असायला पाहिजे, असेही श्री. ओक यांनी सांगितले. यावेळी बोलताना पंडित विश्वनाथ दाशरथे म्हणाले की, ललित कला अकादमीतून शिकत असताना स्व घरी सेवक, गुरु घरी साधक आणि रंगमचावर कलाकार म्हणून रहावे. गुरुचा विश्वास जपत समर्पण भावना मनात नव्याने शिकत असताना जोपासता आली पाहिजे. संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी म्हणाले, की लोककला आणि ललित कला अकादमीच्या माध्यमातून युवकांना एक हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे, यासाठी सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देईल. पं. विश्वनाथ दाशरथे यांनी आपल्या सुमधुर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी सुरुवातीला राग दुर्गा सादर केला. विलंबित एकताल आणि दृत एकतालाची बंदिश गाऊन त्यांनी दुर्गा राग नटवला. त्यानंतर मंदारमाला नाटकातील 'सोहम हर डमरू बाजे' हे सुरेख असे नाट्यगीत सादर केले.भैरवी रागातील सुंदर असे भजन गाऊन संगीत मैफिलीची सांगता झाली. या मैफिलीत रसिक मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाला संवादिनीवर श्री. दिनेश सन्यासी यांनी साथ केली तर श्री. जय कराड यांनी तबल्यावर साथ दिली. या संगीत मैफिलीस शहरातील संगीत रसिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी माळी- उगले यांनी केले तर डॉ. मोहिनी रायबागकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# अपघातात युवक जागीच ठार

जालना। प्रतिनिधी

भरधाव ट्रकने दुचाकीला जोराची धडक दिल्याने वास्तुशांतीसाठी लागणारे पूजेचे साहित्य आणण्यासाठी गेलेल्या सतीश पांडुरंग घोरपडे (वय २३) या युवकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी वाढोणा (ता. भोकरदन) शिवारात घडली.

वाढोणा येथील सतीश घोरपडे यांच्या कुटुंबाने गावाच्या शेजारी घराचे बांधकाम केले होते. त्या घराची शुक्रवारी वास्तुशांती होती. वास्तुशांतीच्या पूजेसाठी लागणारे आंब्याचे फाटे आणण्यासाठी तो शेतात जात होता. त्यावेळी भरधाव ट्रकने (क्र. एम.एच.१८-बी.ए. ०१४२) त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. अपघातात तो २५ ते ३० फूट फरपटत गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक चालकाने ट्रक सोडून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पारध पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तसेच ट्रक ताब्यात घेतला.धावडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन झाल्यानंतर मयताच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई, वडील, बहीण, भाऊ असा परिवार आहे. अपघाती मृत्यूमुळे सतीश याचे नवीन घरात राहण्याचे स्वप्न अधुरे राहिले. सतीशचा अपघाती मृत्यू झाल्याने गावकरी हळहळ व्यक्त करीत आहेत. या प्रकरणात राजू पांडुरंग घोरपडे यांच्या तक्रारीवरून ट्रक चालक समाधान कुंडलिक पाटील (रा. धुळे) याच्याविरुद्ध पारध पोलिसात नोंद झाली असून, तपास धावडा बिट जमादार प्रदीप सरडे, जीवन भालके हे करीत आहेत.

# जालना येथील जेपीसी बँकेस भास्कर अंबेकर, राजेश राऊत यांची भेट

जालना। प्रतिनिधी

**दि जालना पिपल्स् को-ऑप. बँकेच्या सदर बाजार येथील मुख्य कार्यालयास ३१ ऑगस्ट रोजी जालना शहराचे माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना (उबाठा) जिल्हाध्यक्ष भास्करराव अंबेकर व माजी उपनगराध्यक्ष श्री. राजेश राऊत यांनी सदिच्छा भेट दिली. बँकेचे चेअरमन संजय मुथा यांनी श्री. भास्कर अंबेकर यांचे तर व्हा. चेअरमन संजय भरतीया यांनी राजेश राऊत यांचे शाल, पुष्पहाराद्वारे स्वागत केले. यावेळी शिवसेना (उबाठा) शहराध्यक्ष बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, नगरसेवक संदीप नाईकवाडे, गणेश भोसले, कुंदनलाल कठोठीवाले यांचे पुष्पहारे स्वागत करण्यात आले.**

यानंतर महाव्यवस्थापक विजय जोशी यांनी बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी संचालक राजकुमार दायमा, सुनिल चौधरी, सुभाष वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर बँकेचे चेअरमन संजय मुथा यांनी बोलतांना श्री. अंबेकर हे जालना शहराचे नगराध्यक्ष असतांना त्यांनी शहराचा मोठ्या प्रमाणावर विकास करून विविध सामाजिक कार्य यशस्वीरित्या पुर्ण केले मध्यंतरी जेपीसी बँकेचे ठेवीचे व्याजदर राष्ट्रीयकृत बँकेसारखे होते. मात्र ठेवीदार, सभासद यांना बँकेवर दृढ विश्वास होता त्यांनी त्यांच्या ठेवी बँकेतच ठेवल्या व वेळोवेळी नुतनीकरण ही केल्या नवीन संचालक मंडळाने पदभार घेतल्यानंतर मुदत ठेवीचे व्याजदर मोठ्या प्रमाणावर वाढविलेले आहे. तसेच अंबेकर यांचे यापुर्वीही वेळोवेळी सहकार्य बँकेस प्राप्त झालेले आहे व भविष्यात ही प्राप्त होईल असे नमुद केले. यानंतर माजी उपनगराध्यक्ष श्री. राऊत यांनी पुर्वी जेपीसी वैभवशाली व नामांकित व्यापा-यांची बँक म्हणुन प्रसिध्द होती. या बँकेमुळे शहरामध्ये इतर बँका येण्यास तयार नसत. जेपीसी बँकेचे अध्यक्षाला शहरात आजही वेगळे व महत्वाचे स्थान आहे. काही वर्षापुर्वी बँकेचे आर्थिकस्थिती बिघडली होती. मात्र त्यानंतर च्या संचालक मंडळाने योग्य ते निर्णय घेवुन व कार्यवाही करून बँकेची स्थिती हळूहळू सुधारली नवीन संचालक मंडळाचे नेतृत्वात बँक आणखी चांगली प्रगती साधेल याचा विश्वास व्यक्त केला. यानंतर सत्काराला उत्तर देतांना श्री. अंबेकर यांनी बँकेचे संचालक मंडळातील बहुतांश संचालक कोणत्या-न-कोणत्या मार्गाने माझ्याशी जुळलेले आहे. जेपीसी बँकेशी माझा संबंध माजी अध्यक्ष राजेंद्र ओझा यांचेपासुन आलेला आहे त्यावेळी आम्हास बँकेविषयी कुतहल वाटायचे. बँकेचे नांवातच पिपल्स्? आहे म्हणजे जनतेची बँक यामुळे लोकांमध्ये आपलेपणाची भावना आपोआप निर्माण होते. दररोज ही बँक, ती पतसंस्था बंद झाली अशा बातम्या आपण वर्तमानपत्रात व टी. व्ही. वर पाहतो. ज्या बँकेचे संचालक मंडळ विश्वासपात्र व कार्यक्षम असेल तर सभासदांचे पैसा सुरक्षित राहतो. नवनिर्वाचित संचालक मंडळाचे कार्यकाळात जेपीसी बँकेची भक्कम प्रगती होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन संजय भरतीया, संचालक राजकुमार दायमा, ॲड. अनिल संचेती, किशोर देविदान, अनुराग अग्रवाल, सुनिल बियाणी, सुनिल चौधरी, सुभाष वाघमारे, चंद्रप्रकाश सोडाणी महाव्यवस्थापक विजय जोशी, प्र. व्यवस्थापक विलास जाधव, बँकेचे सभासद अशोक शर्मा, अशोक जोगड, अनिल कुलकर्णी, शकीलखान पठाण, रविंद्र गुप्ता, नहारसर, बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शेवटी बँकेचे संचालक ॲड. अनिल संचेती यांनी आभार व्यक्त केले.

# पान १वरून...

### तुमची लेक

नाही. तर उठणारा आवाज जाती, धर्माशी जोडला जाऊ नये. सरकारने देशातील शेतकऱ्यांचे ऐकले पाहिजे. शेतकरीही या देशातील कुटुंबाचे सदस्य आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आंदोलनावर बसण्याचा आणि बोलण्याचा अधिकार आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असून त्या मागण्या बेकायदेशीर नाहीत. त्यामुळे माझी केंद्र सरकारला विनंती आहे की, सरकारने शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. त्यांच्या मागणीचा विचार करावा. शेतकरी असेच रस्त्यावर बसले तर देशाची प्रगती होणार नाही, असेही विनेशने म्हटले आहे.

-------

### सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी

नाही. ही बाब लक्षात घेऊन शिवसेनेच्या वतीने आम्ही बीडमधील युवक-युवतींसाठी भव्य नौकरी भरती मेळाव्याचे आयोजन केले असून या मेळाव्याय उपस्थित राहणाऱ्या प्रत्येकास शंभर टक्के नौकरीची संधी मिळणार आहे. याबरोबरच जागेवर नियुक्तीपत्र देखील देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे नौकरी मिळवण्यासाठी कोणत्याच उमेदवारवारास पैशांची आवश्यकता भासणार नाही. बीडमधील तरुण वर्गाने जास्तीतजास्त संख्येने नोकरी भरती मेळाव्यात प्राधान्याने उपस्थित राहून नौकरीची संधी प्राप्त करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

---------

### पुढील तीन दिवस

विभागाने म्हटले आहे. यामुळे १ सप्टेंबरला विदर्भात मुसळधार ते तुरळक ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. या आठवड्यात पश्चिम आणि मध्य भारतातील बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम पावसाची शक्यता आहे. पश्चिम मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील तुरळक ठिकाणी १ ते २ सप्टेंबर दरम्यान जोरदार पावसाची शक्यता आहे. तसेच कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात १ ते ६ सप्टेंबर दरम्यान जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा जिल्ह्याला १ ते ४ सप्टेंबर दरम्यान जोरदार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला ३ ते ४ सप्टेंबर दरम्यान तर कोल्हापूर जिल्ह्यासाठी ४ सप्टेंबरला यलो अलर्ट राहील. अकोला, नागपूर, वर्धा जिल्ह्यात दोन दिवस जोरदार पावसाची शक्यता आहे.

-----------

### राजस्थानी मल्टीस्टेटच्या

पुण्यातूनच अभिषेक बियाणी याला अटक झाली आहे. राजस्थानी मल्टीस्टेटचे अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांच्यासह अख्खे संचालक मंडळच या घोटाळ्यात सामील होते. यात ठेवीदारांचे जवळपास ३०० कोटी रुपये बुडवत बीडच्या परळीतील मुख्य शाखेसह सर्व शाखा बंद करत पोबारा केल्याची संतापजनक घटना घडली होती. कष्टाचा पैसा बुडण्याच्या स्थितीत आल्याने ठेवीदारांमध्ये संतापाची लाट उसळली होती. त्यातील १७ जणांवर फसवणूकीचा गुन्हाही दाखल करण्यात आला होता.

------------

### बीडमधील कुंटणखान्याचा

कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष आणि बीड ग्रामीण पोलिसांनी संयुक्तरित्या केली. बीड शहरातील कल्याणनगर, चऱ्हाटा फाटा येथे तळेगाव येथील सुरज नवनाथ भोसले हा बाहेर जिल्ह्यातील महिलांना बोलावून त्यांच्याकडून व्येशा व्यवसाय करीत असल्याची गुप्त माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या प्रभारी वर्षा व्हगाडे यांना मिळाली. त्यानंतर पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्या यांनी कारवाईचे आदेश देताच सापळा रचण्यात आला. एका डमी व्यक्तीला कुंटणखान्यात ग्राहक बनून पाठवण्यात आले. त्यानंतर त्या व्यक्तीला खात्री पटल्यावर त्याने ठरल्याप्रमाणे पोलिसांना इशारा केला. आजूबाजूलाच असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष व बीड ग्रामीण ठाण्याच्या पोलिसांनी छापा मारला. पत्र्याच्या शेडमध्ये हा गोरखधंदा चालत होता, यावेळी ६ महिलांसह मॅनेजर मारोती उर्फ विशाल रघुनाथ मिटकर यांना ताब्यात घेण्यात आले. पिडीत महिलांकडे पोलिसांनी विचारपूस केली असता सुरज भोसले व विशाल मिटकर हे पैशाचे अमिष देवून आमच्याकडून व्येशा व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. याप्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या फिर्यादीवरुन सुरज भोसले, विशाल मिटकर (रा. तळेगाव, ता. बीड) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वंभर गोल्डे, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे, बीड ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाचे पोउपनि परमेश्वर सानप, सहाय्यक फौजदार प्रताप वाळके, पोशि सतिश बहिरवाळ, दिपाली सावंत, पोपटराव गोंडे, अनिता खरमाटे, सविता सोनवणे, राऊत, गायकवाड यांनी केली.

-------------

### स्व.विनायक मेटे यांना

सन २०२० -२१ सालासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण राष्ट्रपती द्रोपती मुर्मु यांच्या हस्ते दि. ३ सप्टेंबर रोजी विधान भवन, मुंबई येथे होणार असून पुरस्कार स्विकारण्यासाठी डॉ. ज्योतीताई मेटे यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

------------

### अनैतिक संबंध असल्याच्या

ता. धारूर या सालगड्याने त्याची पत्नीचे एका पुरूषा सोबत अनैतिक संबंध असल्याच्या चारित्र्याच्या संशया वरून डोक्यात काठी मारून जागीच खून केला. खून केल्या नंतर आरोपी विलास आघाव हा पळून जात असताना पोलिसांना याची माहिती मिळताच त्याला ताब्यात घेतले. युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे घटनास्थळी पोहोचले असुन कार्यवाही करीत आहेत. घटना स्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी भेट देणार आहेत. मृतदेह शविच्छेदनासाठी सरकारी दवाखान्यात हलविला आहे. मयत सौ सुवर्णा आघाव हिला तीन अपत्ये आहेत.

------------

### तर एमपीएससीलाही भ्रष्टाचार,

होणारा घोळ, आता अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने एमपीएससीत होणाऱ्या सरकारी हस्तक्षेपाची तक्रार. या दोन्ही बाबी अत्यंत चिंताजनक आहेत. एमपीएससी परीक्षांसाठी सामान्य, गोरगरीब, होतकरू मुले प्रचंड मेहनत घेत असतात. या सरकारचे आतापर्यंतचे 'काळे कारनामे' पाहता, सरकारी हस्तक्षेप वाढल्याने एमपीएससीलाही भ्रष्टाचार, पेपरफुटीची कीड लागण्याची भीती आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तक्रार ग्राह्य धरून एमपीएससीची स्वायत्तता अबाधित ठेवली पाहिजे. एमपीएससी जर स्वतःची स्वायत्तता टिकवून ठेवू शकत नसेल तर मुलांच्या भविष्याचे तरी रक्षण कसे करेल, असा सवालही यावेळी त्यांनी उपस्थित केला. जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, महिला व बाल कल्याण विभागाकडून नुकताच एक आदेश जारी करत ११४५ रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेश दिले. तसेच हे कंत्राटी कर्मचारी ब्रिक्स इंडिया प्रा.लि. कंपनीमार्फत भरण्यात येणार आहेत. याच कंपनीला शिक्षण विभागाने नियम डावलून वैद्यकिय शिक्षण विभागात कंत्राटी पध्दतीने भरतीचे काम दिले होते. या निमित्ताने ही कंपनी कोणाची आहे, हा कंत्राटदार कोणाचा लाडका आहे, असा सवाल उपस्थित करत याचे उत्तर महाराष्ट्राच्या जनतेला मिळाले पाहिजे अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

---------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. १ सप्टेंबर २०२४


# योगेश भैय्याच्या पाठीशी ताकदीने उभा –गोरख काळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमांमध्ये योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या पाठीशी गोरख काळे यांनी मोठी ताकद उभा केली. यापुढेही ती ताकद कायम राहील असे मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्यात दोन दिवसापूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा दौरा झाला.



या दौऱ्यात विविध गटातील समाजाने उपस्थिती दर्शवली. त्यातच मांगगारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांनी योगेश भैय्या क्षीरसागर यांचे नेतृत्वाखाली या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ताकद उभा केली. अनेक दिवसापासून गोरख काळे हे योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या साठी जिवाचे रान करीत आहे त्यांना आमदार करण्यासाठी खारीचा वाटा उचलत आहेत. जिल्ह्यातील मांग गारुडी समाज एकत्र करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली. समाजाची ही ताकद योगेश भैय्या क्षीरसागर आमदार होईपर्यंत कायम पाठीशी ठेवणार असल्याचे गोरख काळे यांनी स्पष्ट केले.

# भावनेचा संचार झाल्याशिवाय बुद्धी गतिमान होत नाही –अमृत ऋषी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

अमृत ऋषी महाराजांनी भावना हेच जीवन आहे. भावनेची शक्ती, भावनेची उत्कटता, यांच्या वाचून केवळ बौद्धिक कसरतीने कोणी परमेश्वराकडे पोहोचत नाही. बुद्धी ही चैतन्यहीन अवयवा सारखी असते. तिच्यात जेव्हा भावनेचा संचार होतो. तेव्हाच ती गतिशील होते आणि कार्य करू लागते. जगाच्या पाठीवर सर्वत्र तुम्हाला अशेच आढळेल म्हणून तुम्ही सदैव मनात करुणा रुजवली पाहिजे. मात्र अशी करुणा रुजवण्यास आणि अशी भावना उद्धवण्यास अनंत-अनंत काळाची पुण्याई जागृत झाल्याशिवाय आणि आपले शुभ कर्म जुटल्याशिवाय हे कार्य साध्य होत नाहीं. असे मत ही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

पुढे बोलतांना अमृत ऋषी महाराज म्हणाले की, आत्मा हा परमात्मा बनतो सर्व प्रकारचे विशिष्टता ही उपलब्ध असते. मात्र त्या असिस्टाला विशेष रूप घेऊन विशिष्ट बनवणे हे असंभव ठरते.विशुद्धी ही त्याला कारण ठरते विशिष्ट ला विशुद्धीचे नाही अशुद्धी हेच कारण असते ज्याच्यामुळे भगवंत बनण्याचे भाव वाढतात आणि तो आत्मा विषुद्दीतून वाढला जातो. त्या ईश्वराचे आपण दास आहोत की त्याला अज्ञानी लोक मनुष्य म्हणून संबोधित असतात असा आत्मा कोणताही कलंकीत न राहता विशुद्धीमध्ये विराजित असतो. आत्म प्रतिहारीयुक्त असा तो परमात्मा होतो. जो मान अभिमान तेला सुटत नाही त्याला परमात्म्याचे दर्शन घडत नाही. यासाठी आपण झुकावे लागते. वाकून दर्शनाला जावे लागते हेच तर आपणास भारतीय संस्कृतीच्या पुरातन मंदिरातून पाहण्यास मिळते. कारण या मंदिराची दरवाजे लहान असल्यामुळे परमात्म्याचे दर्शन घेण्यासाठी तुम्हाला त्या दरवाजातून वाकून जावे लागते. आज गोकुळाष्टमी अर्थात भगवान श्रीकृष्णाचा जन्म महोत्सव श्रीकृष्णाचा जन्म झाला त्यावेळी असणारी परिस्थिती व आपण आज साजरा करत आहोत या परिस्थितीमध्ये फरक वाटतो कारण प्रतिकूल परिस्थितीमध्ये भगवंताचा जन्म झाला तर अनुकूल परिस्थितीमध्ये आपण उत्साहात हा सन साजरा करतो.




अंतकरणातून शुद्ध भावनेपोटी आपण जर परमेश्वराची आराधना केली तर परमेश्वर पावतो याचे उदाहरण त्यांनी जळगाव मधील व्यापार्यांचे दिले ८० रुपये महिन्याप्रमाणे नोकरी करणारे आज आठ मोठ मोठ्या ज्वेलरीच्या शोरूमचे मालक आहेत त्याचे कारण शुद्ध अंतकरणातून त्यांनी केलेली परमेश्वराच्या आराधना तीही अगदी नियमाने सामायिक केल्याशिवाय तोंडात पाणी घेणार नाही ही त्यांची दृढ निश्चितता होती. अशा कर्तव्यातून आपला इतिहास लिहिला जातो. लवकरच परयुशन पर्व सुरुवात होत आहे. हा परवाचा समय जप, तप, ज्ञान, स्वाध्याय, क्षमा याचना यासाठीच आहे. या काळात आपण आपली जीवन उद्धारण्यासाठी या संवत्सरी पर्वात आपल्या जीवनाच्या कल्याणासाठी दक्ष राहावे असेही त्यांनी सांगितले.

# पिंपळवंडी येथे साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती मोठ्या जल्लोषात साजरी

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.२८/०८/२०२४ बुधवार रोजी लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची सार्वजनिक जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली.

राजे छत्रपती शिवाजी महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन गुरूवर्य महंत स्वामी महादेवानंद भारती महाराज श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी चेअरमन भागवत खरमाटे, उपसरपंच दादासाहेब पवार, मु.अ.दिलीप पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,बाळू गाडे, दिपक गाडे,उमेश गाडे,नाना गाडे,राम



गाडे आदींची उपस्थिती होती. तसेच सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची सजलेल्या आकर्षक घोड्यांच्या रथातून डिजेच्या तालावर,तोफ, फटाक्यांच्या आतिषबाजीत तरुणांबरोबरच ग्रामस्थ,महिला-पुरुषांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने आण्णाभाऊ साठेंच्या जयघोषात भव्य मिरवणूक शांततेत संपन्न झाली. जयंती उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी बाळू गाडे,दिपक गाडे, विजय मोरे,संजय गाडे,उमेश गाडे, संजय मोरे,राजू मोरे, आजिनाथ गाडे आदींनी परिश्रम घेतले.

# नंदीग्राम विद्यालयाची वनभोजन सहल व क्षेत्रभेट कपिलधार येथे उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था बीड, संचलित नंदीग्राम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची दि. ३० ऑगस्ट २०२४ शुक्रवार रोजी विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री.सुनीलजी शिंदे सर व जेष्ठ शिक्षक श्री.सर्जेरावजी खाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली वनभोजन सहल व क्षेत्रभेट आज विविध उपक्रम घेऊन चाकरवाडी,मोरदरा,खजिनाविहीर कपिलधार येथे संपन्न झाली.

विद्यार्थ्यांनी कपिलधार येथील मन्मथ स्वामी चे दर्शन घेऊन धबधबा पाहण्याचा आनंद घेतला. मन्मथ स्वामीचा इतिहास व कार्य विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. कपिलधार च्या ऐतिहासिक व



भौगोलिक माहिती यासंबंधी श्री. शिंदे सर व खाडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिकपणे भोजनाचा आस्वाद घेतला. निसर्गरम्य बालाघाट वर येऊन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम त्यामध्ये भक्तीगीत, राष्ट्रभक्ती गीते, गवळणी, हिंदी गीत, मराठी गीत विद्यार्थ्यांनी सादर केली व त्यावरून नृत्य सादर केले.

श्री.धुमाळ सर, श्री. मोरे सर,श्री. चाळक सर,श्री. लोंढे सर,श्रीम.काशीद मॅडम श्री. सोनवणे विजय हे उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील तरुणाचा शिवसेनेत प्रवेश

**जालना । प्रतिनिधी**

बदनापुर तालुक्यातील सोमठाणा , शेलगांव , मांडवा दाभाडी येथील अनेक तरुणाचा शिवसेनेत बदनापुर येथील जनसंपर्क कार्यालयात जाहीर प्रवेश करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन शिवसेना उपनेते मजी मंत्री अर्जूनभाऊ खोतकर यांच्या प्रमूख उपस्थितीत व जालना जिल्हाप्रमुख मा. श्री भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वात सोमठणा , दाभाडी, शेलगाव, मांडवा येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात बदनापूर विधानसभा क्षेत्रातील अनेक युवकांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला .या पक्षप्रवेश माजी मंत्री अर्जुनराव खोतकर संपर्क प्रमूख पंडितराव भुतेकर युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर शिवसेना जिल्हाप्रमुख मा .भाऊसाहेब घुगे यांनी उपस्थित




शिवसैनिकांशी संवाद साधला ज्यात महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. ना. श्री एकनाथजी शिंदे यांनी महाराष्ट्रातील जनतेसाठी , विशेषतः महिलांसाठी ज्या विविध योजना काढल्या आहेत त्याबाबतीत सविस्तर माहिती देण्यात आली . आणि या सर्व योजनांसाठी सामान्य नागरिकांना मदत करण्याचे आवाहन त्यांनी त्यांच्या भाषणात केले सोमठाणा येथील योगेश वीर, नवनाथ वीर,जनार्धन वीर, भाऊसाहेब वीर, श्रीराम वीर, तुकाराम बुचुडे, गणेश सपकाळ,परेमेश्वर सपकाळ, भिमराव गायके, शुभम तोगे, संतोष बोरुडे, गोरखनाथ बोरुडे, सचिन बोरुडे, सुमित वीर, सुरेश कानुले. तर शेलगांव येथील विशाल अंभोरे, गणेश राईदे ,उमेश अंभोरे,मनोज अंभोरे,पवन अंभोरे,ज्ञानु नवले, ऋषी राईदे, नकुल कानुले,दिपक कानुले, अर्जुन अंभोरे, रमेश राईदे,किरण कोमाटे, राहुल कोमाटे, अमोल गाडेकर, प्रमोद कानुले, गजानन कानुले, दिनेश राईदे.व मांडवा येथील दिपक मिसाळ, कृष्णा मिसाळ, आनंद चंद, विष्णु चंद, संतोष मिसाळ,शंकर मिसाळ, बाबा सुरडकर,बद्री चंद,सुदाम सोलाट, बाबासाहेब सोलाट, संदिप सोलाट, नारायण वाघमारे, नवनाथ वैद्य, दशरथ वाघमारे, विठ्ठल अवधूत, काशीनाथ परळकर, सचिन अलंकार, गणेश बारसे, वैभव मिसाळ, विशाल सोलाट, सोपान सोलाट, गणेश सोलाट, बाबासाहेब मिसाळ, गोविंद मिसाळ,अजय वाघमारे, गणेश वाघमारे. तसेच दाभाडी येथील ज्ञानेश्वर कोल्हे, अर्जुन बकाल, परमेश्वर बकाल,इंदर कोल्हे,सोनु भसंडे, आकाश बकाल,शंकर मईन्द, राहुल जाधव,पवन बकाल, ज्ञानेश्वर टेकाळे, शिवाजी जोशी, योगेश बकाल, कैलास कोल्हे, समाधान शिंदे, विजय कोल्हे, सुनिल टेकाळे, कैलास बकाल, सचिन बकाल, गणेश बकाल, मच्छिंद्र बकाल, भगवान बकाल, गणेश मिसाळ, समाधान टेकाळे, विशाल बकाल, शिवाजी खमाटे, शंकर टेकाळे बालाजी मिसाळ, संदिप कोल्हे, दत्ता खमाटे, कारभारी खमाटे,सुदाम बकाल यांनी दिनाक २५ अँगस्ट रोजी शिवसेना शिंदे गटात बदनापुर येथील जनसंपर्क कार्यालयात पक्ष प्रवेश केला यावेळी जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे , तालुका प्रमुख कल्याणराव अवघड , उप तालुका प्रमुख महादु गिते , उप तालुका प्रमुख हरिभाऊ कापसे, युवासेना ता . प्र . ईश्वर पा . जुंबड , विधानसभा प्रमुख कैलास दुधानी , अंबादास कोळसकर , अमोल दाभाडे , कैलास खैरे , रमेश चोरमारे , दिपक डिगे , रामेश्वर दराडे , कैलास वैद्य , विलास वैद्य , अशोक अंबिलढगे , रामेश्वर नागवे , राजेंद्र चौधरी व तालुक्यातील पदाधिकारी , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महायुतीच्या सरकारकडून जनतेची घोर फसवणूक –ए.जे. बोराडे

**परतुर । प्रतिनिधी**

महायुतीचे अभद्र सरकार खोट्या योजना राबवत असून त्या भविष्यात चालू राहतील की नाही याची शास्वती नाही, या फसव्या योजना राबवून महायुतीचे सरकार जनतेची दिशाभूल करत आहे असा घणाघात शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाप्रमुख ए. जे.पाटील बोराडे यांनी केला. लिंगसां ता.परतुर येथे भाजपामधून शिवसेनेत आलेल्या शेकडो कार्यकर्त्यांचा श्री बोराडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख माधवमामा कदम, तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, परतूर विधानसभा समन्वयक अशोकराव आघाव, मंठा पंचायत समितीचे माजी सभापती तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष वरकड, बाबाराव राठोड,, डॉ. दत्तात्रय काकडे, डॉ. संतोष पवार, तुळशीराम कोहिरे, शाहीर मामा, शिवसेनेचे परतूर



शहरप्रमुख दत्ता पा. सुरुंग, उपतालुकाप्रमुख प्रदीप ठोके यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी लिंगसा येथील सचिन डवले, सुभाष गोरे, राम अंभोरे, अमोल गोरे, विशाल मोगल, गजानन बर्वे, भगवान जाधव, राजेभाऊ मंधने, विश्वास करपे, सचिन माने, महादेव गायकवाड, संतोष कळते, राजू पवार, गजानन पवार, किशोर पवार, रामेश्वर मंधने, आकाश डवले,संदीप डवले,बबन डवले, दिलीप करपे, शेख बुढान, सखाराम गायकवाड,,नारायण माने, माधव तांगडे, दगडुबा पितळे, दत्तात्रय करपे, अविनाश पवार, विश्वास गायकवाड,, दिगाबर पवार बाबाराव पवार, कृष्णा दराडे या भाजपच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. पुढे आपल्या भाषणात जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव नाही. महागाईने सर्वसामान्य जनतेचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे अशा परिस्थितीत सरकार फसव्या योजना आणून जनतेची दिशाभूल करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# राज्य गणेशोत्सव स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्यास ५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना स्पर्धेत सहभागी होता यावं यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ५ सप्टेंबर २०२४ करण्यात आली आहे.

गणेशोत्सव मंडळांनी संपूर्ण भरलेला अर्ज .. या ई-मेल आय. डी. वर पाठवणे आवश्यक आहे. स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून स्पर्धा नि:शुल्क आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट ,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. ७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु. २५,०००/- रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

पान ६ वरून...

## मोहन गुंड यांच्या अन्नत्याग

महोदय यांना अनेक वेळा मेल द्वारे तसेच जिल्हाधिकारी मार्फत निवेदन देवून हि कसलीच दखल न घेतल्याने बाधीत शेतकऱ्यांच्या वतीने अंबाजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले होते.भाई मोहन गुंड व संघर्ष समितीचे पदाधिकारी बाधीत शेतकरी यांनी अन्नत्याग सुरू केला होता या मध्ये प्रमुख मागणी शक्तिपीठ महामार्ग, अधिसूचना रद्द करा, तसेच बीड जिल्हा ७५% उर्वरित विमा वाटप करा, राष्ट्रीय महामार्गावरील राजकीय जाहिरात बॅनर फलक लावण्यावर बंदी करा . शक्तिपीठ महामार्ग भूसंपादन बाबतची अधिनियम १९५५ नुसार सक्तीच्या भूसंपादनाची जाहीर केलेली अधिसूचना रद्द करावी. शक्तिपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांच्या बरोबर कसलीच चर्चा न करता, त्यांच्या सहमती शिवाय भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करू नये. या मागण्यासाठी मोहन गुंड यांनी पाच दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते. या आंदोलनात मोठ्या संख्येने शक्तिपीठ महामार्ग बाधीत शेतकरी देखील सहभागी झाले होते.

## माली पारगाव येथे कर्जमाफिसह

माली पारगाव फाट्यावर आज दिनांक ३१ऑगस्ट रोजी सकाळी १०:०० वा शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी, सरसकट पिक विमा देऊन शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव द्यावा, तसेच शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्या. लोकनेते कारखान्या सह सर्वच थकीत रकमेची पूर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करा, माजलगाव तालुक्यातील सर्वच पांदण रस्त्याचे मुरूम खडीकरण करा, माली पारगावची बस सेवा सुरळीत करा. खरीप २०२०,२०२३ व रब्बी२०२४ चा पीकविमा सरसकट सर्वांना मिळाला पाहिजे, ई-पीक पहाणीची अट रद्द करून सोयाबीन, कापसाला दहा हजार आणि सोयाबीनला सात हजार हमीभाव मिळाला पाहिजे, शेतात जाण्यासाठी पादंन रस्ते झाले पाहिजेत,अशा वेगवेगळ्या मागण्यांसाठी शेतकरी नेते भाई अ‍ॅड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. निलाराम टोळे, नामदेव सोजे,अंगद खांबे, अण्णासाहेब म्हस्के, श्रीराम कोरडे, श्रीराम शेवाळे,अनंत शिंदे यांच्या सह शेतकरी संघटनेचे गंगाधर बापु गायकवाड, अर्जुन भाऊ कदम, बाबुराव मामा रद्दे, पांडुरंग रद्दे, विठ्ठलराव राठोड, महादेव गायकवाड, उद्धव गायकवाड, किशोर गाडेकर,ईश्वर सोजे, ओमकार ढिसले, यांच्या सह परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित तलाठी,मंडळाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनस्थळी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त राखला.यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी करत शासनाचा निषेध व्यक्त केला, त्यावेळी वाहनाच्या तब्बल तीन किलोमीटर रांगा लागल्या होत्या.

## रविवारी अंबाजोगाईत ओंकार

सत्येदू रापतवार व समूहाने नुकतीच दक्षिण आफ्रिकावारी केली आहे.आपल्या शहरातील या तरुण कलावंतांचे आफ्रिकन नागरिकांनी कौतुक करून त्याच्या कलाविष्काराचे कौतुक केले आहे.अशा या गुनीजन कलावंतांचा गौरव सोहळा गुरुवार दिनांक १ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन, नगरपरिषद सार्वजनिक वाचनालय अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, डॉ. सिद्धेश्वर बिराजदार, डॉ. श्रीनिवास रेड्डी, ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ सदस्य व पत्रकार अनिलजी महाजन, हल्ला विरोधी कृती समिती जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर, प्रशांत लाटकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या प्रसंगी अंबाजोगाई करांच्यावतीने सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन ओंकार रापतवार याचा जाहीर सत्कार मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. तसेच सत्कार कार्यक्रमानंतर लगेचच आंतरराष्ट्रीय कलावंत स्व. मुकेशजी यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने अंबाजोगाई शहरातील कलावंतांची गीत मैफिल संपन्न होणार आहे. स्व. मुकेशजी यांचे विविध गाणे या ठिकाणी ऐकावयास मिळणार आहेत.तरी या दोन्ही कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अंबाजोगाई कलाकार कट्टाचे संस्थापक अध्यक्ष तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, परमेश्वर गीते, व मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई च्या वतीने करण्यात आले आहे.

## जलसंपदा विभागातील लक्ष्मण

गुरुजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी लक्ष्मणराव हजारे यांना उर्वरित सुखी आणि निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. जलसिंचन विभाग पाटबंधारे यामध्ये काम करत असताना लक्ष्मणराव हजारे यांनी सातत्याने शासन आणि शेतकरी यांच्या हितासाठी काम केले. अनेक वेळा सुट्टीवर असतानाही त्यांनी गरजेच्या वेळी आपल्या सेवेला प्राधान्य दिले. त्यांचे हे कार्य खरोखर कौतुकास्पद आहे असेही बदामराव पंडित म्हणाले. यावेळी ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थिती होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धर्मराज करपे यांनी तर आभार प्रदर्शन जगदीश हजारे यांनी केले.

## अल्पसंख्याक समाजातील

पर्याय ठरू शकतो. या माध्यमातून आपण सर्व स्तरातील वयोगटातील महीलांना सामावून घेऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव देऊन त्यांचं स्वयम्? रोजगारात रूपांतर करुन शासनाच्या विविध योजना तसेच सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून ब्युटीपार्लर, मेकअप आर्टिस्ट, मेहंदी आर्ट, ड्रेस डिझायनर, विणकाम भरतकाम, पाककला, उन्हाळ काम याच प्रशिक्षण घेऊन त्याच स्वयम्? रोजगारात रूपांतर केलं तर घर बसल्या आपण उत्तम अर्थार्जन करू शकतोत असा विश्वास उपस्थित महिलांमध्ये निर्माण केला. तर प्रमुख अतिथी शिंदे ताई यांनी विविध उपक्रमाच्या संकल्पना मांडल्या. या कार्यशाळेला परिसरातील महीला भगीनी मोठ्या प्रमाणात उपस्थित लावली होती.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या

नियुक्ती केली आहे.तर उपजिल्हाध्यक्षपदी वसंत माने, अंबाजोगाई तालुकाध्यक्षपदी दिपक सुरवसे, अंबाजोगाई युवक तालुकाध्यक्षपदी बालाजी वाघमारे, युवक शहराध्यक्षपदी श्रीनिवास कचरे, कर्मचारी संघटना तालुकाध्यक्ष पदी राजकुमार वखरे आणि सोशल मीडिया अंबाजोगाईच्या तालुकाध्यक्षपदी नागेश सावंत याना त्यांच्या निवडीचे नियुक्तीपत्र देण्यात करण्यात आले. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्रीरंग (आबा) सुरवसे हे होते. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. नवनिर्वाचित पदाधिकारी यांना देण्यात आलेल्या नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे की, आपली समाजाप्रती असलेल्या सदभावनांची, संघटनात्मक कौशल्याची व महाराष्ट्र नाभिक महामंडळ, मुंबई प्रती असलेल्या दृढ विश्वासाची दखल घेवून आपली महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या विविध पदावर महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे व कार्याध्यक्ष दामोदर बिडवे, प्रदेश सरचिटणीस पांडुरंग भवर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र कावरे, विभागीय अध्यक्ष युवराज शिंदे यांच्या आदेशाने नियुक्ती करण्यात येत आहे. सदरील नियुक्ती पुढील आदेशापर्यंत अबाधित असेल. नियुक्ती दरम्यान आपण महामंडळाची घटना, नियम, नियमावली अनुसरूनच कार्य करावे. जेणेकरून महामंडळाचा नांवलौकिक वाढेल. यावेळी समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवर, महामंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन बालाजी वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सामाजिक कार्यकर्ते कविराज कचरे यांनी व्यक्त केले.

## जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत

खेळाडू व क्रीडा शिक्षकांचा सत्कार जिल्हा क्रीडाधिकारी पंडित चव्हाण यांनी केला. विजयी खेळाडूंचे अभिनंदन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी डॉ.सुरेश खुरसाळे, चंद्रशेखर बर्दापूरकर , प्राचार्य भीमाशंकर शेटे,गणपत व्यास, कमलाकर चौसाळकर,अ‍ॅड . जगदीश चौसाळकर, डॉ .शैलेश वैद्य,रमण सोनवळकर ,प्रा डॉ.जयश्री मोटेगावकर , अ‍ॅड .कल्याणी विर्धे , मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी, स्मिता धावडकर, शिक्षक प्रतिनिधी जिजा गवळे, देवनंदा सोनर ,शारदा मुंडे , तोंडाकुरे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थीनींनी केले .

cmyk



# इलेक्ट्रीक ट्रॅक्टर शेतकऱ्यांना मिळणार एवढ्या किमतीत

भारतात आता इलेक्ट्रीक वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. रस्त्यांवर सर्रास इ कार, दुचाक्या दिसू लागल्या आहेत. देशातील पेट्रोल, डिझेलच्या गगनाला भिडणाऱ्या किमतींमुळं कितीतरी शेतकरीसुद्धा आता त्यांच्या शिवारात ईट्रॅक्टर वापरू लागले आहेत. पारंपरिक डिझेलवर चालणाऱ्या ट्रॅक्टर्सला ही इलेक्ट्रीक ट्रॅक्टर्स पर्याय ठरु लागला आहे. भारतात सध्या ४५ या इलेक्ट्रीक ट्रॅक्टरची जोरदार चर्चा आहे. आधुनिक शेतीच्या भविष्यासाठी कमी खर्चात अधिक कार्यक्षम असणारा हा ट्रॅक्टर इतर डिझेलच्या ट्रॅक्टरपेक्षा पाच पटीनं किफायतशीर असल्याचं सांगितलं जातंय. या ट्रॅक्टरच्या लाँचींगला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही हजेरी होती. एका चार्जिंगवर हा ट्रॅक्टर किमान ६ तास काम करू शकतो असा या कंपनीचा दावा आहे. घरगुती सॉकेट (१५) शी जोडून ते सहजपणे चार्ज केले जाऊ शकते. नियमित (सिंगल फेज) चार्जरसह, त्याची बॅटरी पूर्णपणे चार्ज होण्यासाठी अंदाजे ६ तास लागतील, तर तीन-फेज चार्जरसह, त्याची बॅटरी केवळ ३ तासांमध्ये पूर्णपणे चार्ज होऊ शकते. त्याची लोडिंग क्षमता १०-१५ टन आहे.

कमी देखभालीत मोठी बचत

कंपनीचे म्हणणे आहे की, कृषी कामांव्यतिरिक्त, हा ट्रॅक्टर धातू उत्पादन, सिमेंट उत्पादन, बांधकाम




उद्योग, विमानतळ, संरक्षण आणि बायोमासशी संबंधित कामांसाठी योग्य आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते पूर्णपणे इलेक्ट्रिक आहे, त्यामुळे डिझेलवर खर्च होणाऱ्या पैशांची मोठी बचत होऊ शकते. कंपनीचे म्हणणे आहे की त्याची देखभाल देखील खूप किफायतशीर आहे. कोणत्याही डिझेल ट्रॅक्टरच्या तुलनेत त्याची चालण्याची किंमत खूपच कमी आहे. चांगल्या कामगिरीसाठी, हा ट्रॅक्टर उच्च टॉर्क आणि तीव्र प्रवेग देतो.

किती काळ चालेल बॅटरी?

प्रत्येक इलेक्ट्रिक वाहन खरेदीदाराच्या मनात येणारा हा एक मोठा प्रश्न आहे. कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर दिलेल्या माहितीनुसार, या इलेक्ट्रिक ट्रॅक्टरच्या बॅटरीचे लाइफ सायकल ३००० आहे. म्हणजे त्याची बॅटरी साधारण ८ ते १० वर्षे सहज टिकू शकते. मात्र, ते वाहनाच्या लोड, वापर आणि तापमान श्रेणीवर देखील अवलंबून असते.

डिझाइन पारंपरिक ट्रॅक्टरसारखेच

४५ हा लूक आणि डिझाइनच्या बाबतीत पारंपरिक ट्रॅक्टरसारखाच आहे. या कंपनीनं सांगितलं, हा इलेक्ट्रिक ट्रॅक्टर शेतीचा खर्च कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. यामध्ये कंपनीने ३२ क्षमतेची इलेक्ट्रिक मोटर दिली आहे जी जास्तीत जास्त ४५ पॉवर जनरेट करते. यात ३५ क्षमतेचा बॅटरी पॅक आहे, जो एका चार्जवर सुमारे ८ एकर क्षेत्रात ८ तास काम करू शकतो.

४५ ट्रॅक्टरची किंमत काय?

एखाद्या शेतकऱ्याने जर तीन हंगामात आठ एकर शेतीचे काम केले आणि इतर व्यावसायिक कामे केली तर त्या काळात तो डिझेलवर लाखो रुपयांचा खर्च करत असतो. परंतु आता या इलेक्ट्रिक ट्रॅक्टरचा जर वापर केला तर दरवर्षी लाखो रुपयांची बचत शेतकऱ्यांना शक्य होणार आहे.

या इलेक्ट्रिक ट्रॅक्टरची सुरुवातीची किंमत रु. १५.०० लाख आहे. मात्र, यात इलेक्ट्रिक वाहनांवरील सबसिडीचा समावेश नाही. सबसिडी वेगवेगळ्या राज्यांवर अवलंबून असेल, त्यानंतर त्याची किंमत रु. आणि ते कमी होईल. असे सांगण्यात आले आहे.

# कोरडवाहू शेतीत चिंच लागवड ठरेल फायदेशीर



जर आपण चिंच लागवडीचा विचार केला तर हव्या त्या प्रमाणात चिंचेचे लागवड क्षेत्र नाही. परंतु कोरडवाहू शेतीसाठी चिंच लागवड एक वरदान ठरू शकते. चिंच लागवडीत जास्त काही व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करण्याची गरज नसून एक जमिनीची निवड आणि चिंचेच्या प्रमुख जाती इत्यादी गोष्टी माहित असणे आवश्यक आहे. चिंचेची लागवड पद्धत आणि खत व्यवस्थापन यावर विशेष लक्ष दिले तर चिंच लागवड एक वरदान ठरू शकते.

तुम्हाला जर चिंचेचे रोप किंवा कलम यांचे लागवड करायची असेल तर त्यासाठी एक बाय एक बाय एक मीटर आकाराचे खड्डे खोदून घ्यावेत.

ज्या वेळेस तुम्ही एकटे भराल त्यावेळी खड्ड्याच्या तळाशी दहा ते पंधरा सेंटीमीटर उंचीपर्यंत पालापाचोळा टाकावा व त्यानंतर चांगले कुजलेले शेणखत अंदाजे पंधरा किलो, नत्र, स्फुरद आणि पालाश या मुख्य अन्नद्रव्ये यांचे मिश्रण शंभर ग्रॅम आणि २०० ग्रॅम निंबोळी आणि माती यांचे मिश्रण करून खड्डे भरावेत. खड्डे भरताना मातीत १०० ग्रॅम कीडनाशक पावडर मिसळली तर फायद्याचे ठरते. एक दोन चांगले पाऊस पडल्यानंतर रोप किंवा कलमांची मुख्य शेतात लागवड करावी. त्यामुळे पावसाळी दमट हवामानाचा झाडाच्या वाढीसाठी भरपूर फायदा होतो. झाडाचे मर कमी होते व झाडाची वाढ जोमदार होते. उन्हाळ्यामध्ये आवश्यक ओलावा टिकून राहावा यासाठी हा यामध्ये वाळलेले गवत, पाचटाचे आच्छादन किंवा भुसा वगैरे यांचा वापर फायद्याचा ठरतो. चिंचेच्या झाडाची वाळवी किंवा मूळकूज इत्यादीपासून बचाव करण्यासाठी शिफारसीत बुरशीनाशक व कीटकनाशकांचे आळवणी प्रत्येक रोपाच्या आळ्यात करावी. चिंचेच्या झाडाला वळण देणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी जेव्हा झाड एक मीटर उंचीची होईल तेव्हा त्याचा शेंडा खुडावा. कारण यामुळे चारी दिशांना चिंचेच्या फांद्यांची वाढ होते व आकार देखील डेरेदार होतो.चिंचेच्या झाडाची इतर फळबाग प्रमाणे नियमित छाटणी करण्याची आवश्यकता नाही. आत्ता जेव्हा तुम्ही दरवर्षी चिंचा तोडल्यानंतर झाडावर जे काही वाळलेल्या फांद्या असतात त्या कापून काढाव्यात.जेव्हा चिंच काढणी पूर्ण झाल्यानंतर बागेला पाण्याचा चांगला ताण द्यावा. यामुळे फुलधारणा जास्त प्रमाणात होते व फुलांचे रूपांतर फळांमध्ये झाल्यानंतर पाणी द्यावे.

# द्राक्ष बागेत कलम करताना अशी घ्या काळजी

अलीकडे वातावरणातील बदल, ओलिताच्या पाण्याची उपलब्धता व दर्जा अशा अनेक कारणांमुळे स्वमुळावरील द्राक्ष बागेत दर्जेदार उत्पादन मिळण्यास मर्यादा येत आहे. अशा स्थितीत द्राक्ष पिकाची अभिवृद्धी छाट कलमांपेक्षाही कलमाद्वारे करण्याची गरज आहे.

खुंट (रूटस्टॉक) काडीची पूर्वतयारी व निवड : बागेत ज्या खुंटावर आपण कलम करणार आहोत, त्यावर कलम करण्याकरिता सरळ वाढणारी, सशक्त (८-१० मि.मी. जाड) आणि रसरशीत काडी निवडावी. अशी काडी असल्यास कलम यशस्वी होण्यास मदत होते. अशी काडी मिळविण्यासाठी कलम करण्याच्या आधी १५ ते २० दिवस जोमदार वाढ असलेल्या ३ ते ४ काड्या सरळ बांबूला बांधून घ्याव्यात. अन्य काड्या काढून टाकाव्यात. कलम करतेवेळी जमिनीत पुरेसा ओलावा असला पाहिजे. जमिनीत अपेक्षित ओलावा नसल्यास कलम करण्याच्या २ ते ३ दिवस आधी ठिबक सिंचनाद्वारे भरपूर पाणी द्यावे. असे केल्यास काडीमध्ये अन्नद्रव्ये व पाण्याचा प्रवाह पूर्ववत होईल. काडी रसरशीत होऊन कलम यशस्वी होण्यास मदत होईल.

कलम करण्याचा योग्य कालावधी : सर्वसाधारणपणे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासून ही परिस्थिती राज्यात दिसून येते. या कालावधीपर्यंत मातृवेलीवरील काडीदेखील परिपक्व झालेली असते. त्यासाठीच ऑगस्ट - सप्टेंबरमधील कालावधी कलम करण्यास योग्य मानला जातो.

कलम करण्याची पद्धत : कलम यशस्वी होण्यासाठी कलम करणाऱ्या कामगाराची कुशलता अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कुशल व्यक्तीकडून कलम करून घ्यावे. कलम करताना खुंटाची तयार झालेली फूट बांबूपासून अलग करावी. जमिनीपासून दीड फूट उंचीवर आडवा काप घ्यावा. त्यानंतर फुटीवरील सर्व पाने व इतर फुटी काढून घ्याव्यात. कोणतेही कलम १०० टक्के यशस्वी होण्याची खात्री देता येत नसल्याने एका खुंटावरील दोन फुटींवर एकाच वेळी कलम करून घेणे फायदेशीर ठरते. कापलेल्या खुंट काडीच्या वरच्या बाजूस धारदार चाकूने चार ते पाच सें.मी.पर्यंत उभी खाच घ्यावी. कलम करण्यासाठी खुंट काडीच्या (फुटीच्या) जाडीची कलम काडी निवडावी. कलम काडी परिपक्व आणि कमीत कमी दोन डोळ्यांची असावी. अशी निवडलेली काडी कार्बेन्डाझिम* १ ते २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात २ ते ३ तास बुडवून ठेवावी. त्यानंतर खुंट काडीला जुळणारी कलम काडी निवडून कॅम्बियमला इजा न करता धारदार चाकूच्या साह्याने पाचरीसारखा आकार तयार करावा. ही काडी कलम करण्यास वापरण्यापूर्वी ज्या ठिकाणी काप घेतलेला असतो, तो भाग ६-बीए (१५-२० पीपीएम) या द्रावणात बुडवून घ्यावा. त्यानंतर खुंटावर घेतलेल्या उभ्या खाचेमध्ये कलम काडीचा पाचरीसारखा आकार व्यवस्थित बसवून त्यावर पॉलिथिन पट्टी घट्ट बांधावी. कलम काडी व खुंट काडीची साल एकमेकांना योग्य पद्धतीने जुळेल, याची दक्षता घ्यावी.



# केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना

जर आपण केळी पिकाचा विचार केला तर सगळ्यात पटकन डोळ्यासमोर येतो तो जळगाव जिल्हा होय. महाराष्ट्रामध्ये जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक केळी पिकाची लागवड होते व उत्पादन देखील या जिल्ह्यात जास्त होते, म्हणून जळगाव जिल्ह्याला केळीचे आगार असे संबोधले जाते. जर आपण केळी पिकाचा विचार केला तर घडाच्या गुणवत्तेवर सर्व काही अवलंबून असल्यामुळे केळी पिकाची लागवड केल्यापासून उत्तम पद्धतीने काळजी घेणे खूप गरजेचे असते.

निर्यातक्षम उत्पादन घ्यायचे असेल तर केळी घडाची गुणवत्ता खूप महत्त्वाची भूमिका पार पाडते. घडाची गुणवत्ता वाढीसाठी काही छोटे परंतु महत्त्वाच्या उपाययोजना केल्या तर नक्कीच फायदा होऊ शकतो.

फण्यांची विरळणी करणे आवश्यक असते- केळी फळाच्या आकारमानामध्ये चांगले बदल करून येण्यासाठी घड लवकर परिपक्व होणे खूप गरजेचे असते. यासाठी फण्याची योग्य वेळी विरळणी करणे गरजेचे आहे. केळीच्या काही वानांमध्ये घडाला नऊ पेक्षा जास्त फण्या येतात. त्यामुळे अशा जास्त फण्या राहिल्या तर सर्वांना योग्य पोषण घटक न मिळाल्याने त्यांचे आकारमान एकसारखे राहत नाही व दर्जा ढासळतो. यासाठी एक घडावर सहा ते आठ फण्या ठेवून बाकीच्या विळ्याच्या साह्याने व्यवस्थितपणे कापून टाकणे गरजेचे आहे.



यामुळे फळे एकसारख्या आकाराची येतात.

जमिनीची मशागत- केळीच्या बागेतील जमीन वेळोवेळी स्वच्छ करणे गरजेचे असून ती कायम ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. केळी बागेतील जमिनीची मशागत लागवडीनंतर तीन चार महिन्यात सुरू करणे गरजेचे असून या कालावधीत कोळपणी देऊ शकतात. परंतु त्याच्या पुढे हाताने चाळणी करण्याचा सल्ला जाणकारांकडून दिला जातो. झाडाला थोडीशी उंच भर ठिबकसाठी करावी. या भरीचा फायदा हा वाऱ्यापासून झाडाचे संरक्षण करण्यासाठी होतो.

बुंध्यालगतचे उपठोंब काढणे- बऱ्याचदा केळीच्या झाडाच्या बुंध्याला उपठोंब येऊ लागतात व ते वेळोवेळी काढणे गरजेचे आहे. त्यामुळे रोपाला संरक्षण मिळते. हे ठोंब काढण्याचे काम झाडाला फुले येईपर्यंत करणे गरजेचे आहे.

केळीमध्ये जर मिश्र पिकांची लागवड करायची असेल तर त्यांची निवड करताना मुख्य पिकातील अंतर, अन्नद्रव्यांचा पुरवठा इत्यादी बाबींची खूप काळजी घेणे गरजेचे आहे. खासकरून केळी बागेला करायचा अन्नद्रव्यांचा पुरवठा इत्यादी बाबींचा विचार करून केळीला मोहोर आल्यावर अशी पिके घ्यावीत. यामध्ये लक्षात घ्यावे की आंतर पिके ही मोहराच्या विरुद्ध दिशेने हवीत व पिकापासून दूर असावी.

केळफुल कापणे आहे गरजेचे- जेव्हा केळीची पूर्ण निसवन होते तेव्हा सर्व फण्या केळ कमळातून तून बाहेर पडतात. दोन ते तीन दिवसात खाली उमलणारे केळफुल धारदार विळाच्या साह्याने व्यवस्थित कापून घ्यावे. त्यामुळे केळफुलाला अनावश्यक होणारा अन्नपुरवठा हा वाढणाऱ्या घडास मिळतो घडाच्या उत्तम वाढीस मदत होते. तसेच सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे केळ फुलांमध्ये आसरा घेणाऱ्या रेड रस्ट थ्रीप्स या किडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

नरकळ्या खुरडून टाकणे- नरकळ्या काढून टाकल्यामुळे घडावरील फळ वाढण्यासाठी मदत होते आणि फांदीचे वजन वाढते. त्यामुळे या नरकळ्या एक दोन हात लांबीवर एका बोटाचे अंतर ठेवून कापून टाकने महत्वाचे आहे.




## महत्वाच्या घटना

१९०६ : इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ इंटलेक्च्युअल प्रोपर्टी ॲटॉर्नींची स्थापना झाली.

१९११ : पं. भास्करबुवा बखले यांनी पुण्यात भारत गायन समाजाची स्थापना केली.

१९१४ : रशियातील सेंट पीट्सबर्ग शहराचे नाव बदलुन पेट्रोग्राड करण्यात आले.

१९२३ : टोक्यो आणि योकोहामा परिसरात भूकंप १,०५,००० ठार.

१९३९ : जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले. या घटनेमुळे दुसर्या महायुद्धाची सुरुवात झाली.

१९५१ : अर्नेस्ट हेमिंग्वे यांची 'द ओल्ड मॅन अ‍ॅन्ड द सी' ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक व पुलित्झर पुरस्कार मिळाले.

१९५६ : भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना झाली.

१९६१ : ची स्थापना (१ सप्टेंबर १९६१) (राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद )

१९६९ : लिबीयात उठाव होऊन हुकूमशहा मुअम्मर गडाफी सतेवर आला.

१९७२ : आइसलँडमधील रिकजेविक येथे अमेरिकेच्या बॉबी फिशरने रशियाच्या बोरिस स्पास्कीला बुद्धीबळात पराभूत केले व जगज्जेता बनला.

१९७९ : पायोनियर- ११ अंतराळयान शनीपासून २१,००० किमी अंतरावरुन गेले.

१९८५ : संयुक्त अमेरिकन-फ्रेंच मोहिमेमुळे बुडालेले आरएमएस टायटॅनिक सापडले.

१९९१ : उझबेकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९५ : न्यूयॉर्क हेरॉल्ड चे संस्थापक जेम्स गॉर्डन बेनेट सीनियर यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १८७२)

१८१८ : कोस्टा रिका देशाचे पहिले राष्ट्रपती जोस मारिया कॅस्ट्रो माद्रीझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १८९२)

१८९५ : मानव-सक्षम विमानांचे निर्मिते एंगलबर्ट जशचा यांचा जन्म. (मृत्यू: २६ जून १९५५)

१८९६ : अभय चरणारविंद भक्तिवेदांत तथा स्वामी प्रभूपाद हरेकृष्ण पंथाचे संस्थापक (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९७७)

१९०८ : कृष्ण नारायण तथा के. एन. सिंग हिन्दी चित्रपटांतील गाजलेले खलनायक (मृत्यू: ३१ जानेवारी २०००)

१९१५ : राजिंदरसिंग बेदी ऊर्दू कथाकार आणि हिन्दी पटकथालेखक. साहित्य अकादमी पुरस्कार (१९६५), पद्मश्री (१९७२). 'दस्तक' या चित्रपटाची कथा, पटकथा, लेखन व दिग्दर्शन त्यांचे असून या चित्रपटाला तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ? ? १९८४)

१९२१ : माधव मंत्री यष्टीरक्षक व उजव्या हाताचे फलंदाज

१९३० : भारतीय आर्किटेक्ट चार्ल्स कोरिया यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून २०१५)

१९३१ : भारतीय शास्त्रज्ञ आणि विद्वान अब्दुल हक अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑक्टोबर २०१२)

१९४६ : दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष रोह मू-ह्युन यांचा जन्म.

१९४७ : साली भारतीय राजकारणी व लोकसभेचे माजी अध्यक्ष तसचं, मेघालय राज्याचे माजी मुख्यमंत्री पी. एम. संगमा यांचा जन्मदिन.

१९७० : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री आणि लेखक पद्मा लक्ष्मी यांचा जन्म.

१९७६ : जेष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर स्मृतिदिन

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७४ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू (जन्म: ५ मे १४७९)

१५८१ : गुरू राम दास शिखांचे चौथे गुरू (जन्म: २४ सप्टेंबर १५३४)

१७१५ : सलग ७२ वर्षे राज्यकारभार केल्यानंतर फ्रान्सचा राजा १४ वा लुई मरण पावला. त्याचा राज्यकाल कोणत्याही युरोपीय राज्यकर्त्यापेक्षा जास्त होता. (जन्म: ५ सप्टेंबर १६३८)

१८९३ : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (जन्म: ३० ऑगस्ट १८५०)

२००८ : थॉमस जे. बाटा बाटा शू कंपनीचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९१४)

२०१४ : स्पॅनडेक्स चे निर्माते योसेफ शेव्हर्स यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९३०)

२०२० : जेर्झी स्काझाकिएल पोलिश स्पीडवे रायडर, विश्वविजेते (जन्म: २८ जानेवारी १९४९)

२०२० : शेखर गवळी भारतीय क्रिकेटपटू,(महाराष्ट्र) (जन्म: ६ ऑगस्ट १९७५)

cmyk

# मसणजोगी समाजाच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवणार- अनिल जगताप

## पांगर बावडी येथील लाडक्या बहिणींकडून अनिल जगताप यांचे अभूतपूर्व स्वागत

बीड । प्रतिनिधी

हिंदुह्रदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला राजकारण कधी शिकवलंच नाही. तुमच्या सारख्या गरजू माणसांच्या समस्या सोडून समाधान कमवण्याचे संस्कार त्यांनी आम्हा शिवसैनिकांवर केलेले आहेत. याठिकाणी आज आल्यावर आम्हाला समजतंय की, प्रत्येक पुढऱ्याने तुमचा केवळ मतदाना पुरताच वापर केला असून आपल्या समाज वस्तीकडे कायम दुर्लक्ष केले आहेत. म्हणूनच आजही या वस्तीवर रस्ते, नाली, पाणी, अंगणवाडी सारखे मूलभूत प्रश्न अनुत्तारित राहिलेले आहेत. निवडणुकांना आणखीन वेळ आहे. मी आमदार होईल तेंव्हा होईल. मात्र त्याआगोदर अत्यंत गरजेचा आणि दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असणाऱ्या पाण्याचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत. येत्या दोन चार दिवसातच अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने याठिकाणी पाण्यासाठी बोर घेऊन देण्यात येईल. यामुळे याठिकाणी पाण्याची अडचण काही प्रमाणात सुटेल. याबरोबरच बाळासाहेबांचा शिवसैनिक आणि तळागाळातील माणसांचे जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांचा एक प्रामाणिक कार्यकर्ता या नात्याने आम्ही तुमच्या आडीअडचणीसाठी उभा राहू. येणाऱ्या काळात मसणजोगी समाजाच्या विकासासाठी नेटाने प्रयत्न करून निधी उपलब्ध करून घेणार आणि आजवर प्रत्येकाने दुर्लक्षित केलेल्या या मसणजोगी समाजाच्या समस्या प्राधान्याने सोडवणार असल्याचे अभिवचन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी दिले.



काल रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील पांगर बावडी येथे स्थानिक महिलांनी आम्हा शिवसैनिकांसाठी रक्षा बंधनाचा गोड कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी आम्ही बीड शिवसेनेचे सर्व पदाधिकारी गेलो असता त्यांनी अभूतपूर्व स्वागत करत महिला भगिनींनी औक्षण करून राखी बांधली, अनेक महिला भगिनींचे आशिर्वाद मिळाले. उपस्थित सर्व महिलांना शिवसेनेच्या वतीने साडी भेट दिली. याबरोबरच उपस्थित महिलांशी मुक्त संवाद साधला. त्यांच्या समस्या आडी-अडचणी समजून घेतल्या. आजही या भागात पाण्याची मोठी अडचण असल्याचे समजले. तसेच रस्ते, नाली, शाळा इत्यादी समस्यांचे निवारण करण्यासाठी एक शिवसैनिक या नात्याने पुढाकार घेणार नव्हे सर्वोप्रथम या वस्तीवरील अडचनींचे निवारण करणार आहे. या भागतील अनेक महिलांचे अद्याप आधार कार्ड, मतदान कार्ड, बँक अकाउंट, रहिवाशी, राशन कार्ड देखील काढल्या गेलेले नाहीत म्हणून या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येत नाही. मात्र बीड शिवसेनेच्या वतीने या ठिकाणी कॅम्प लावून आम्ही शिवसैनिक हे सर्व कागदपत्रे काढून देऊन या महिला भगिनींना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देणार आहोत असे या ठिकाणी सांगतले. माझे सहकारी उप जिल्हा प्रमुख संतोष जाधव आणि राज्य महिला आयोग सदस्या संगीता चव्हाण यांनी लाडकी बहीण योजनेचे महत्व आणि त्याचा अधिकाधिक महिलांनी लाभ घ्यावा याबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी सुनील सुरवसे - शिवसेना जिल्हा संघटक, संतोष जाधव - शिवसेना उपजिल्हाप्रमुख, अजय जाधव -शिवसेना उपजिल्हाप्रमुख, फर्जना शेख- महिला आघाडी उपजिल्हाप्रमख, सुनील अनभूले - बीड विधानसभा प्रमुख, किशोर जगताप- माजी जिल्हा परिषद सदस्य, संजय उडान - माजी नगरसेवक, गजानन कदम - युवा सेना, किशोर गिराम- युवा सेना, प्रतिक कांबळे शिवसेना मीडिया प्रमुख, अमोल जाधव, अमोल जाधव,कृष्णा संखोड,दीपक शेनुरे,सखाराम शेणुरे,सुनील शेणूरे शिवसेनेचे इतर पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांच्यासह महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# सादोळा प्रशालेतील सुधाकर मुळे यांची सेवापूर्ती



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सादोळा येथे प्रशालेतील श्री सुधाकर साहेबराव मुळे सर यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा संपन्न झाला. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री सुनिल केंद्रे तर प्रमुख उपस्थिती म्हणून मा.दिनकर जाधव माजी कृषी संचालक,श्री अंकुशे केंद्रप्रमुख साळेगाव,श्री संजय चौरे केंद्रप्रमुख,श्री संजय पाटील केंद्रप्रमुख,श्री अर्जुन बोरडे केंद्रप्रमुख,श्री शिवहार चोपणे केंद्रीय मुख्याध्यापक,प्रशालेचे मुख्याध्यापक श्री जोगदंड सर,सादोळा गावचे सरपंच श्री अंगदराव इंगळे,उपसरपंच कमलाकर राऊत,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सूर्यकांत शिंदे,उपाध्यक्ष दिनकर राऊत,पोलीस पाटील सुधाकर शिंदे,ग्रामपंचायत सदस्य,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य,ग्रामस्थ,मित्रपरिवार,युसूफ वडगांव केंद्रातील सर्व महिला- पुरुष शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी श्री मुळे सर यांचा सपत्नीक सेवापूर्ती सत्कार सोहळा मान्यवरांच्या हस्ते मानाचा फेटा,मायेची शाल पुष्पहार तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट देऊन करण्यात आला . तर द्वितीय सत्रामध्ये माहे ऑगस्ट ची शिक्षण परिषद संपन्न झाली.यात दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषयावर प्रकाश टाकण्यात आला.श्री बोराडे सर यांनी प्रशासकीय बाबींची माहिती दिली.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री लाखे सर यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री जोगदंड सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेच्या शिक्षकांचे तसेच केंद्रातील शिक्षकांचेही अनमोल सहकार्य लाभले.

# अंबाजोगाईला लवकरच होणार राज्यस्तरीय सोयाबीन महाअदालत

युसूफवडगांव । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासुन सोयाबीनचे दर घसरत चालले असुन शेतकरी वर्गात जनजागृती करण्यासाठी येणाऱ्या काही दिवसांत अंबाजोगाईला राज्यस्तरीय सोयाबीन महाअदालत घेण्यात होणार असल्याची माहिती संयोजक अच्युत गंगणे,शिवराज खरबड,नारायण पांडे,उत्तमराव माने यांनी दिली आहे.

गेल्या तीन वर्षापासून शेतकरी घरात सोयाबीन ठेवून बसलेला आहे आज ना उद्या सोयाबीनचे भाव वाढतील अशी आशा शेतकऱ्यांना होती.परंतु सरकार सोयाबीनचे भाव दिवसेंदिवस घसरत जातील अशी परिस्थिती निर्माण करत आहे.८ ते १० हजार रुपयावरती गेलेले सोयाबीनचे भाव आता पामतेल जवळपास २१ लाख टन आयात केल्यामुळे पार रसताळाला गेले आहे.पामतेलाची आयात सुरूच आहे इकडे नवीन सोयाबीन बाजारात येणार आहे जुने सोयाबीन शेतकऱ्यांनी तसेच घरात ठेवले आहे शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या मनात सरकार बद्दल व सर्वपक्षीय लबाड पुढार्या बद्दल प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे त्या असंतोषाला वाचा फोडण्यासाठी व सोयाबीनच्या भावावरती सातत्याने होत अन्यायाला अन्याला वाचा फोडण्यासाठी येणाऱ्या काही दिवसांमध्ये अंबाजोगाई येथे राज्यस्तरीय सोयाबीन महादलत घेण्यात येणार आहे . या सोयाबीन महाअदालत मध्ये पुढील विषयावर चर्चा करण्यात येणार आहे १)सरकारचे पामतेल व आयात निर्यात विषय धोरण,२)सोयाबीनची उत्पादकता वाढवण्यासाठी तंत्रज्ञान विरोधी सरकारचे धोरण,३)सोयाबीन उत्पादन खर्च वाढल्यामुळे सोयाबीनचे हमीभाव वाढवुन मिळावेत व तात्काळ सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात.तरी लवकरच या महाअदालतीची तारीख व वेळ सुनिश्चित करून शेतकऱ्यांना कळवण्यात येणार असल्याची माहिती संयोजक अच्युत गंगणे,शिवराज खरबड,नारायण पांडे,उत्तमराव माने यांनी दिली आहे.

# मोहनराव जगताप यांच्या जनसंपर्क गाठी भेटी दौऱ्यास प्रतिसाद



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभेचे भारतीय जनता पक्षाचे निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांनी मागील आठ दिवसापासून माजलगाव तालुक्यातील गंगामसला, सोमठाणा,निपाणी टाकळी,शिंपे टाकळी, खरात आडगाव, रामनगर, मोठेवाडी, गुंजथडी, सुरुमगाव, शुक्ल तिर्थ लिमगाव,खतगव्हान, डाके पिंपरी,कोथरूळ, मोगरा, माळतांडा, उमरी,जीवनापूर (नाथ नगर), लऊळ तांडा,साळेगाव, लोणगाव, सिमरी पारगाव या गंगामसला व आनंदगाव सर्कल मधील ग्रामस्थांची भेट घेण्यासाठी जनसंपर्क दौरा केला. या भेटीदरम्यान ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांनी अडीअडचणी आणि समस्या समजून घेतल्या. त्यांच्या अडचणींना सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन मोहनराव जगताप यांनी दिले.

या जनसंपर्क दोऱ्यावेळी आगामी विधानसभा निवडणूक मोहनराव जगताप हे लढवणार असल्याचे त्यांनी या दौऱ्याच्या माध्यमातून सांगितले आहे. या जनसंपर्क गाटी भेटी दौऱ्यास नागरिकांची गर्दी पहाता उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# जि. प. प्रा. शाळा कदमवाडी मध्ये सजली गोकुळ नगरी

बीड । प्रतिनिधी

जि. प. प्रा. शाळा कदमवाडी बीड येथे यंदाही श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमात लहानग्या चिमुकल्यांनी राधा आणि श्रीकृष्णाच्या वेशभूषेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक श्री. अरुण सापते आणि अमोल कदम उपाध्यक्ष शा. व्य. समिती उपस्थित होते . कार्यक्रमाची सुरुवात हाथी घोडा पालखी, जय कन्हैया लाल की या श्रीकृष्णाच्या भजनाने झाली. चिमुकल्यांनी राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धेत मोठ्या आनंदाने भाग घेतला,तसेच श्रीकृष्ण आणि राधाच्या जीवनावर आधारित प्रेरक



प्रसंग सादर केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केला, ज्यामुळे पालक मंत्रमुग्ध झाले. शाळेचे मुख्याध्यापक भुषण टेके यांनी मुलांना श्रीकृष्ण आणि सुदामा यांची कथा सांगितली, तर उद्योजक अरुण सापते यांनी श्रीकृष्ण जन्माची कथा सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उत्सवाची सांगता चिमकल्यांनी दहीहंडी फोडून केली, ज्यामुळे वातावरणात जल्लोष पसरला. शेवटी मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक कांबळे सर यांनी केले.

# सिद्धेश्वर विद्यालयातील खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

माजलगाव। प्रतिनिधी

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात दि.२९ ऑगस्ट रोजी मेजर ध्यानचंद यांची जयंती संपन्न. उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना क्रीडाशिक्षक म्हणाले की, राष्ट्राच्या उन्नतिसाठी खेळणारे हॉकी खेळासाठी जगप्रसिध्द खेळाडू मेजर ध्यानचंद त्यांनी वरिष्ठ पदाची पदोन्नती नाकारली, जर्मनी संघासोबत खेळताना तत्कालीन जगज्जेता हिटलर सुद्धा त्यांच्या खेळाने प्रभावित झाला.

अशा आदर्श विश्वप्रसिद्ध खेळाडूचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा व भारत राष्ट्राच्या विकासासाठी आणि देशहितासाठी खेळावे. या प्रसंगी तालुका स्तरीय मैदानी स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारंभ संपन्न झाला. धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक -१७वर्ष वयोगटातील पृथ्वीराज भाऊसाहेब धिरडे ,प्रथमेश निलेश झाडे , पवन पांडुरंग



चुंबळे, जीवन नवनाथ वानखेडे , रिलेरेस मध्ये प्रथम क्रमांक जीवन नवनाथ वानखेडे हरिविजय नवनाथ शिंदे,प्रथमेश निलेश झाडे, ऋषीकेश रामप्रसाद होके तालुका कुस्ती स्पर्धेत प्रथम. कार्तिक मेंडके,अजिंक्य अशोक गायकवाड, सत्यजित अमोल पोटभरे,द्वितीय क्रमांक- सार्थक मेंडके, वरील यशस्वी खेळाडूंचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर ,केंद्रीय कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाश दुगड, सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे ,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले व मार्गदर्शक शिक्षक पंडित मेंडके, श्याम राऊत,श्रीमती भाग्यश्री खोसे, यांचे अभिनंदन केले.

# अश्वत्थलिंग देवस्थानवरील सभामंडपाचे भूमिपूजन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील पंचक्रोशीतील भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग देवस्थानासाठी पर्यटन विकास योजनेतून ५० लक्ष रुपयाचे सभागृह मंजूर झाले असून,त्या सभागृहाच्या सभामंडपाच्या बांधकामाचे भूमिपूजन संस्थांनचे मठाधिपती गुरुवर्य स्वामी महंत ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज व मान्यवरांच्या शुभहस्ते दि. २६/०८/२०२४ सोमवार रोजी संपन्न झाले.

२० बाय १० मीटर क्षेत्राचे हे भव्य दिव्य सभागृह असून या सभागृहाचा येथे वर्षभर साजरे होणाऱ्या धार्मिक उत्सवासाठी उपयोग होणार आहे.या सभागृहाचे (सभामंडप) बांधकाम मुख्य मंदिराजवळील मोकळ्या जागेत होणार आहे.श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर संस्थांनच्या ठिकाणी वर्षभर अनेक धार्मिक उत्सव साजरे केले जातात.त्यामध्ये महाशिवरात्र यात्रा,चौथा श्रावणी सोमवार यात्रा,चैत्र पौर्णिमा यात्रा सोहळा तसेच साधुसंत- महंतांच्या पुण्यतिथी उत्सवासह अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे



कार्यक्रम संपन्न होतात.या सभागृहात सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न होऊन भाविक-भक्तांची मोठी सोय होणार आहे.यावेळी ह.भ.प.परमानंद भारती महाराज,ह.भ.प.शिवानंद भारती महाराज,नारायण बजगुडे महाराज,उपविभागीय अभियंता के.एल.पानसंबळ,कनिष्ठ अभियंता वाय.सी.धनवट,आणि ॲड.एन.एन. साबळे,राजीव नौथर पैठण,शिवसेना तालुका अध्यक्ष अशोक पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार, चेअरमन भागवत खरमाटे,उद्धव रहाटे, बाबासाहेब जाधव,अशोक सारगुडे मुख्याध्यापक दिलीप पवार,शिवाजी शेळके,चोपदार विठ्ठल पवार,बाबू शिंदे,जालिंदर पवार,सुनील पवार, गोकुळ राऊत,बंडू पवार,आबाराजे पवार,पिनू पोकळे,अंकूश जगताप, कल्याण पवार,बाबासाहेब पवार पुणे, बंडू पवार,हरी भालेकर,विष्णू पाटील, प्रणव राऊत आदिंसह भाविक- भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटरमध्ये आज होणार आस्थीरोग तपासणी

## मनके व सांधे बदली शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे रविवार दि ०१ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.

या शिबीरात संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण ६५ हजार रुपये व पुढील खर्चात गुणवत्तापूर्ण इन्प्लांटसह, आर्थोस्कोपी निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील. शिबीरात आस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आनंदऋषीजी रुग्णालयात १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. आज पर्यंत हजारो अस्थिरोग असणार्या रुग्णांवर उपचार करुन असंख्य रुग्ण या आजारापासून मुक्त झालेले आहेत. आस्थीरोग शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे. रविवार दि. ०१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ.रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील आस्त्रीरोग रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड शहरातील सर्व सकल जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.



# राहुल पवार यांची केंद्रीय पोलीस दलात निवड

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील शेतकरी राजेंद्र परसराम पवार यांचा मुलगा राहुल पवार याची केंद्रीय पोलीस दलात (एसआरपीएफ) कुणबी मराठा (ओबीसी) प्रवर्गातून निवड झाल्याबद्दल त्याचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

राहुल पवार हा हुशार व मेहनती विद्यार्थी असून त्याने नियमित अभ्यासाचा सराव करीत हे यश संपादन केले.त्याच्या या निवडीबद्दल सर्वांनी कौतुक करून त्याचा पिंपळवंडी ग्रामस्थ व मित्र परिवाराच्या वतीने शाल,श्रीफळ देऊन व फेटा बांधून तसेच फटाके,तोफा वाजून स्वागत केले.याप्रसंगी सूर्यकांत पवार,प्रशांत पवार,रमेश पवार,अमोल पवार,सागर पवार,सचिन पवार,श्रीकांत उकांडे,गणेश पवार,सय्यद सलीम,विनोद पवार,अशोक पवार,युवराज पवार,सुदाम पवार,शाहूराजे पवार,अंगद जरे,संतोष पवार,बाजीराव पवार,पिनु पवार आदि उपस्थित होते.

### मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज १२३५/२०२४
सोनाबाई मच्छिंद्र जाधव व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार : १. सोनाबाई भ्र. मच्छिंद्र जाधव रा. मु. मोनगीरवाडी पो. बोरफडी ता.जि. बीड, २. लक्ष्मण पि. मच्छिंद्र जाधव, रा. वरील प्रमाणे ३. वचिष्ठ पि. मच्छिंद्र जाधव, रा. वरील प्रमाणे, ४. प्रकाश पि. मच्छिंद्र जाधव, रा. वरील प्रमाणे, ५. गवळण भ्र.नागनाथ कदम, रा. मु.पो. बोरफडी ता.जि. बीड.

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मच्छिंद्र श्रीरंग जाधव यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत मच्छिंद्र श्रीरंग जाधव यांचा मृत्यु दिनांक ०६/११/२०२३ रोजी झाला आहे. यांचे मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत मच्छिंद्र श्रीरंग जाधव यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मच्छिंद्र श्रीरंग जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ११/१०/२०२४ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

ॲड. घुगे जी.एस. (शिक्का)

# निष्क्रीय व कामचुकार मुख्याधिकारी चव्हाण यांच्या कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करा

## जिल्हाधिकाऱ्यांकडे कचरू खळगे यांची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांनी पदभार घेतल्यापासुन ते सतत गैरहजर असतात. कपरिणामी शहरात नागरी सुविधांचा अभाव आहे. फक्त आर्थिक लाभाचे काम करण्यासाठी शहरात येउन अज्ञात ठिकाणी थांबुन धनादेश, मोजमाप पुस्तिाक एम.बी. यावर सह्या करण्यासाठी येतात कार्यालयात कधिचत येत नसल्याचा आरोप करत मुख्याधिकारी चव्हाण यांच्या कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करा अशी मागणी राष्ट्वादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस कचरू संतराम खळगे यांनी जिल्हाधिका-यांकडे निवेदनाव्दारे दि. २६ ऑगस्ट रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात मोठ्या प्रमाणात शासकीय फंड आलेला असुन तो फक्त कागदावर खर्च करण्यात मुख्याधिकारी पटाईत आहेत. प्रभाग क्रं. ७ या मागासवर्गीय वस्तीमध्ये अपुर्ण रोड झालेले असतांना पुर्ण झाले असे दाखवुन बिल अदा करण्यात आले तर याच



प्रभागात नाल्यांचे बांधकाम झालेले नसतांना नाली झाल्याचे दाखवुन बील अदा केले आहे. याच पध्दतीने शहरात झालेले सिमेंट रोड निकृष्ट दर्जाचे झाले असुन काही भागात रस्ते न करताच बिले उचलले आहेत. मागासवर्गीय वस्तीमध्ये आलेले आर्थिक तरतुद बजेट इतर ठिकाणी कामे दाखवुन परस्पर बिले उचलेले आहेत. मुख्याधिकारी कार्यालयात कधिच हजर राहत. त्यामुळे पालिकेचे काम रामभरोसे चालु आहेत. कुठलेही नियमात असलेले काम सहजासहजी होत नाही परंतु आर्थिक देवान घेवाण केल्यास नियमबाह्य तात्काळ करण्यात येते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे माजलगाव शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असुन शहरात साथीचे रोग सुरू आहेत. पाणी पुरवठा दुषीत होत असुन पंधरा दिवसांतुन एकदा शहरवासीयांना मिळते. नळयोजना लिकेज असुन हे दुरूस्तीचे काम एका एजन्सीला दिलेले परंतु एजन्सीधारकांकडुन काम वेळेवर केले जात नाही. त्यामुळे शहरवासीयांना विवीध समस्यांचा सामना करावा लागत असल्याने मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांच्या गैरहजर राहण्याची चौकशी करून कारवाई होईपर्यंत माजलगाव नगरपालिकेवर एका सक्षम प्रशासकाची नियुक्ती करावी अशी मागणीही राष्ट्वादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस कचरू संतराम खळगे यांनी जिल्हाधिका-यांकडे केली आहे.

# बीड फ्रेंडस स्पोर्ट आयोजीत एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत आदर्श संघ अंतीम फेरीत


**बीड । प्रतिनिधी**

१४ वर्षाखालील गटातील मुलांच्या फ्रेंडस्? स्पोर्ट अकॉडमी आयोजीत एकदिवसीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत आजचा उपात्यं सामना जिंकून अदर्श संघाने अंतीम फेरीत प्रवेश केला रायझिंग क्लब गंगाखेड-परभणी विरूध्द अदर्श संघात सामना आज सिदोड येथील डीएसके मैदानावर खेळण्यात आला यावेळी नाणेफेक एडीएफसी क्लबचे अध्यक्ष अजय भैय्या जाधव व गणेश गिराम यांच्या हस्ते करण्यात आली नाणेफेक रायझिंग संघानी जिंकून प्रथम गोलंदीजीचा निर्णय घेतला

यावेळी फलंदीजी करतांना अदर्श क्लबने ३५ षटकांत ७ गडी गमवत १६१ धावा केल्या यांत शौर्य ७ धावा,पृथ्वी २५, श्रवण १४, रूद्र १० तर राजन ६५ धावा केल्या यावेळी रायझींग संघाने गोलंदाजीत अदर्श चोरगूडे यांने २ तर यश



सोनवलकर व श्रवणी काळे हीने एक एक गडी बाद केले १६२ धावाचा पाठलाग करतांना रायझींग संघाने धावसंख्या केली यांत आर्यन कीत्तुरे यांने १३, शोयब शेख २१, तर आदर्श चोरगूडे यांने ३८, व वेदांत काटकर नाबाद २२ धावा करत सर्वबाद १३३ धावा केल्या यावेळी आदर्श संघाकडून गोलंदीजी करतांना रूद्राक्ष जाधव यांने दोन, कृष्णा गायकवाड १, श्रवण गायकवाड २, शौर्य जाधव २, तर पियुष मुळूक ३ गडी बाद करत सामना जिंकवला या सामन्याचा सामनाविर पियुष मुळूक ठरला यांस पोलीस पतसंस्थेचे सचिव संघर्ष गोरे, नगरसेवक मोहसीन भाई गेपाल गुरखूदे, आशोक पुर्णे, यांच्या हास्ते देण्यात आला यावेळी फ्रेंडस स्पोर्ट अकॉडमीचे अध्यक्ष ॲड्. शैलेश जाधव, अजहर शेख,संजय धस, राजेंद्र मोताळे, संतोष कवटेकर, सचिन गायकवाड, बाबासाहेब गोरे, विजय पिवाळ,संजय कुलकर्णी, प्रकाश गालफाडे, विनोद कांडेकर, वेदांत महाजन सह क्रिकेटप्रेमी सिदोड येथील डीएसके मैदानावर सामना पाहण्यासाठी उपस्थित होते



बीड : महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे अध्यक्षपदी सुभाष राऊत बीडमध्ये आले त्यांचे स्वागत करताना दुधाळ,राऊत, ढवळे परिवार

# जलसंपदा विभागातील लक्ष्मण हजारे सेवानिवृत्त

## बदामराव पंडित, भारती महाराजांच्या हस्ते सत्कार

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागात कर्मचारी असलेले लक्ष्मण तुळशीराम हजारे (पांढरे) हे सेवानिवृत्त झाले आहेत. शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, ह भ प रामानंद भारती महाराज तळेवाडी यांच्या हस्ते त्यांचा हृदयसत्कार करण्यात आला.



लक्ष्मणराव तुळशीराम हजारे (पांढरे) हे महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागात कर्मचारी म्हणून सेवेत कार्यरत होते. त्यांची शासकीय सेवा वयोमानानुसार पूर्ण झाल्याने ते दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. बोरी पिंपळगाव येथील सभागृहात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्यात, लक्ष्मणराव हजारे व त्यांच्या पत्नी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून महावस्त्र देत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि हभप रामानंद भारती महाराज तळेवाडी यांनी हृदयसत्कार केला. याप्रसंगी शाखा अभियंता बागपिंपळगाव, व्ही ए परतवार, वि डी कुरले, सागर हिरे, बी बी देशमुख, संतराम काळे, बळीराम कऱ्हे, नारायण नवले, अशोक नरोटे, गणपत गायकवाड ◀◀ पान ३ वर

# महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या युवक जिल्हा उपाध्यक्षपदी गणेश राऊत यांची नियुक्ती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या युवक जिल्हा ऊपाध्यक्ष पदी रोटरी क्लब अंबाजोगाई चे माजी सचिव रो गणेश राऊत यांची निवड करण्यात आली. त्यांच्या या नियुक्तीचे पत्र नुकतेच प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र कावरे यांच्या हस्ते देण्यात आले. तर याचवेळी जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या देखील नियुक्त्या करण्यात आल्या.




महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणजी दळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र (भैय्या)कावरे, मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे,जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील कुणबी मराठा सभागृह येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीत हरीश वाघमारे यांची बीड जिल्हाध्यक्ष पदी तर गणेश राऊत यांनी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या माध्यमातून केलेल्या समाजकार्याची दखल घेत मंडळाच्या वरिष्ठांनी त्यांची महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या युवक जिल्हा उपाध्यक्ष म्हणून त्यांची ◀◀ पान ३ वर

# आज अंबाजोगाईत ओंकार रापतवार याचा सत्कार व स्व. मुकेश यांच्या गीतमैफिलीचे आयोजन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील उदयोन्मुख कलावंत युवा संगीतकार ओंकार रापतवार याने सातासमुद्रापार जात आपला कलाविष्कार सादर करून दक्षिण आफ्रिकेतील नागरिकांनी कला रसिकांनी ओंकार व त्याच्या रंगरेजा समूहाला डोक्यावर घेतले. त्याबद्दल ओंकार रापतवार याचा जाहीर सत्कार तसेच स्व. मुकेशजी यांच्या मैफिलीचे आयोजन रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता अंबाजोगाई कलाकार कट्टा, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन, नगरपरिषद अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई शहरातील कलाप्रेमी नागरिक बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

. अंबाजोगाई कलाकार कट्टा, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शहरातील कलाप्रेमी नागरिकांना वर्षभर विविध कार्यक्रमांची मेजवानी दिली जाणार आहे.त्याचाच एक भाग म्हणून रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता अंबाजोगाई शहरातील उदयोन्मुख कलावंत, युवा संगीतकार ओंकार ◀◀ पान ३ वर

# जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत योगेश्वरी कन्या शाळेचे चारसंघ प्रथम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवकसेवा संचालनालय व जिल्हा क्रीडाधिकारी बीड यांच्या वतीने गुरुवारी जिल्हा स्टेडियमवर जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धा घेण्यात आल्या जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत योगेश्वरी कन्याशाळेच्या चारसंघांनी विविध गटात प्रथम पारितोषिक पटकावले.

मुलींच्या विभागात १४- वर्ष वयोगटात प्रथम , १७- वर्ष वयोगटात प्रथम, १९- वर्ष वयोगटात प्रथम आणि ज्युनियर नेहरू हॉकी स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले . चारही संघाचे व्यवस्थापक म्हणून क्रीडाविभाग प्रमुख अंजली खेडकर यांनी काम पाहिले. यावेळी राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून गुणवंत ◀◀ पान ३ वर

# आज ढोक महाराज यांचे किर्तन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय संत श्री. भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रसंत श्री. भगवान बाबा सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष अविनाश सानप व अध्यक्ष अनिकेत सानप



यांच्या मार्गदर्शनाखाली सालाबाद प्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिरासह सामाजिक उपक्रम राबवत असून त्याचाच एक भाग म्हणून रामायणाचार्य ह. भ. प. श्री .रामरावजी महाराज ढोक यांचे दि.१ सप्टेंबर २०२४ रविवारी रोजी सायंकाळी ८ ते १० या वेळेत भव्य हरी किर्तन व याच दिवशी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत स्वर सम्राट सुरंजन जायभाय व भक्ती जायभाय यांचे स्वर भक्ती भजन संध्याचा कार्यक्रम श्री. संत भगवान बाबा प्रतिष्ठान ,बार्शी रोड, बीड येथे आयोजित केला आहे तरी रसिकांनी व भक्तांनी बहुसंख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय संत श्री भगवान जयंती उत्सव समितीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष अविनाश सानप, अध्यक्ष अनिकेत सानप यांनी केले आहे.

# अल्पसंख्याक समाजातील महिलांच्या उन्नतीसाठी विशेष प्रयत्न-जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

आज अब्दुल अजीज बागबान ऊर्दू हायस्कूल इमामपुर रोड बीड. च्या मुख्याध्यापिका आयेशा बेगम मोहम्मद जावेद बागवान मॅडम आणि शेख अजमत सुलताना मॅडम यांनी अल्पसंख्याक समाजातील महीलांच्या अडीअडचणी समस्या व उपाययोजना याविषयी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या वेळी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी बीड विधानसभा प्रमुख सौ. जयश्री विलास विधाते



तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. संगीता शिंदे यांची उपस्थिती लाभली होती.

या वेळी संस्थेच्या वतीने प्रमुख अतिथींचा शाल पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापिका बागवान मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनात उद्देश विषद केला तर सुलताना मॅडम यांनी प्रश्न उत्तरातुन महीलांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या प्रमुख मार्गदर्शिका सौ. विधातेताई यांनी अल्पसंख्याक समाजातील महीला भगीनींनची सामाजिक आर्थिक उन्नती साधन्यासाठी स्वयम्? रोजगारा हा सक्षम ◀◀ पान ३ वर

# माली पारगाव येथे कर्जमाफीसह विविध मागण्यासाठी अडीच तास रास्ता रोको



**कर्जमाफी न दिल्यास सरकारला धडा शिकवणार -ॲड. नारायण गोले पाटील**

**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षात शेतकरी आणि शेती प्रचंड संकटात असून शेतकरी हजारोंच्या संख्येने आत्महत्या करत असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायला सरकार तयार नाही याउलट अंबानी अदानी यांना कोट्यावधी च्या खैराती वाटण्यात सरकार व्यस्त आहे, गेल्या दहा वर्षात शेतकऱ्याचा आत्महत्येचा आकडा हजाराच्या संख्येने वाढत असताना त्यावर तोडगा काढायला सरकारकडे वेळ नाही, गेल्या दहा वर्षात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या केवळ शेतकऱ्याच्या शेतमालाला किफायतशिर हमीभाव न मिळाल्यामुळे झालेल्या असल्याने शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने कर्जमाफी, पिक विमा, हमीभाव द्यावा अन्यथा शेतकरी सरकारला धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी आंदोलना दरम्यान व्यक्त केले, ◀◀ पान ३ वर

# मोहन गुंड यांच्या अन्नत्याग आंदोलनास एन.डी.शिंदे यांची भेट

**आंबेजोगाई । प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्ष नागपूर गोवा शक्तिपीठ महामार्ग बाधीत शेतकरी संघर्ष समितीचे राज्य अध्यक्ष भाई दिगंबर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर लढा सुरू आहे .त्या अनुषंगाने संघर्ष समितीचे मराठवाडा समन्वयक भाई मोहन गुंड व बाधीत शेतकर्यांनी शक्तिपीठ महामार्ग, अधिसूचना रद्द करा या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांवर सोमवार २६ ऑगस्ट पासून उपविभागीय कार्यालय आंबेजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले



होते. या आंदोलनास केज विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे यांनी भेट देत जाहीर पाठिंबा व्यक्त केला . आपण सदैव या लढ्यासोबत खांद्याला खांदा लावून आंदोलन करण्यास तत्पर राहू असे अभिवचन देखील याप्रसंगी एन डी शिंदे यांनी दिले. सदरील आंदोलनास माजी आमदार पृथ्वीराज साठे, रमेश आडसकर, कॉ काशिनाथ कापसे , कालिदास आपेट, डॉ नरेंद्र कांबळे, कॉ बब्रुवान पोटभरे, माधव जाधव, अनंत जगतकर, अचुत गंगणे,बन्सी जोगदंड जीवन गायकवाड नासेर शेख, संजय साळवे, शाहीर तुकाराम सुवरणकर, सुलभा सोळुंके. विविध पक्ष पदाधिकारी यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

मुळात शेतकऱ्यांना त्यांची भूमिका मांडण्याचा अधिकार हिरावून घेणारा अधिनियम १९५५ हा शक्तिपीठ महामार्ग साठी लावणे हेच अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने हडप करू नयेत बाधीत जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहेत . मुख्यमंत्री ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार दि.०१ सप्टेंबर २०२४ । पान ७

# ससून रुग्णालयासमोरील रस्ते महामंडळाची जागा कवडीमोल दराने बिल्डरच्या घशात घालण्याचा डाव ?

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील ससून रुग्णालयाच्या समोर असलेली आणि कर्क रोगाच्या रुग्णालयासाठी प्रस्तावित असलेली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची पाचशे कोटी रुपयांहून अधिक किंमतीची सव्वा दोन एकर जागा अवघ्या ६० कोटी रुपयांमध्ये बिल्डरच्या घशात घालण्याचा डाव आखण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वतः याला विरोध केला असून जागेच्या बदल्यात मिळणार असलेले ६० कोटी रुपये स्वतः देण्याची तयारी दर्शवली आहे.

विशेष म्हणजे या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यालयं असून त्यापैकी एका कार्यालयात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचं स्मारक असून विश्वेश्वरय्या त्यांच्या हयातीत पुण्यात असताना ते इथून त्यांचं कामकाज पाहायचे. मात्र एन जी व्हेंचर्स या खाजगी बिल्डरला ही जागा द्यायचं रस्ते विकास महामंडळाने ठरवलं आहे. सार्वजनिक



## सार्वजनिक बांधकाम विभागाचा याला विरोध

बांधकाम विभागाची ही सव्वा दोन एकर जागा २६ वर्षांपूर्वी रस्ते विकास महामंडळाला भाडेतत्वार देण्यात आली होती. मात्र, या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाची अनके कार्यालयं अनेक वर्षांपासून काम करत असून उरलेल्या जागेत कॅन्सर रुग्णांसाठीचा स्वतंत्र विभाग सुरु करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र शेकडो कोटी रुपयांची ही जागा खाजगी बिल्डरच्या घशात घालण्याचा हा डाव आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागात कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या अभियंत्यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली असता आपल्याला याबाबत काही माहितीच नसल्याचं उत्तर त्यांनी दिलं आहे. तर रस्ते विकास महामंडळाचे मंत्री दादा भुसे या अभियंत्यांना अद्याप भेटलेलेलच नाहीत अशी माहिती आहे.

ससून रुग्णालयासमोरील मोक्याच्या ठिकाणी असेलेली प्रशस्त सव्वादोन एकरची जागा रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) निधी उभारणीच्या नावाखाली कवडीमोल दराने खासगी बिल्डरच्या घशात घालण्याचा घाट घातल्याचं दिसून येत आहे. केवळ ६० कोटी रुपयांच्या बदल्यात तब्बल ९९ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर ही जागा देण्यात येत आहे.

### रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव

ससून रुग्णालयाचे आधुनिकीकरण करण्यासाठी रस्ते विकास महामंडळाच्या जागेत कर्करोग रुग्णालय उभारण्याचे आदेश अजित पवार यांनी दिले होते. त्या संदर्भात ससून रुग्णालय, प्रशासनाने आणि वैद्यकीय शिक्षण विभागाने कार्यवाही देखील सुरू केली होती.

# तब्बल नऊ हजार विद्यार्थ्यांनी दिली पेट परीक्षा; १२ सप्टेंबरपर्यंत निकाल होणार घोषित

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी प्रवेश परीक्षा (पेट) शनिवारी झाली. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर, नाशिक येथील १८ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. एकूण ४० विषयांसाठी घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी एकूण १० हजार ७०० परीक्षार्थ्यांनी अर्ज केला होता. त्यापैकी नऊ हजार १२८ परीक्षार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेदरम्यान शहरात एका परीक्षा केंद्रावर सुरवातीला तांत्रिक बिघाडामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यापीठाने तांत्रिक बिघाड दुरुस्त केल्यानंतर अवघ्या काही वेळाने परीक्षा सुरळीत पार पडली.



पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया १० जुलैपासून सुरू करण्यात आली होती. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु दरम्यान 'महाराष्ट्र बंद'ची चर्चा सुरू होती. त्यामुळे या काळात परीक्षार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोचण्यास विलंब आणि अडथळा येऊ शकतो, त्यामुळे ही परीक्षा ३१ ऑगस्टला घेण्याचा निर्णय विद्यापीठाने जाहीर केला. त्यानुसार ही प्रवेश परीक्षा शनिवारी सुरळीतपणे पार पडली. या परीक्षेचा निकाल १२ सप्टेंबरपर्यंत जाहीर करण्यात येईल, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी सांगितले. दरम्यान, पुण्यातील जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयात पेट परीक्षेच्या काळात सुरवातीला विद्यार्थ्यांचे लॉगिन होत नव्हते. त्यामुळे गोंधळाचे वातावरण झाले. परंतु, विद्यापीठाने तत्काळ यासंदर्भातील तांत्रिक अडचण दूर केली, त्यानंतर परीक्षा सुरळीत पार पडली, असेही डॉ. रासवे यांनी सांगितले.

# एटीएस कारवाई प्रकरण : नौशाद वर्षापासून कोंढव्यात वास्तव्यास

पुणे । प्रतिनिधी


कोंढव्यातील मिठानगरमध्ये सुरू असलेल्या बनावट टेलिफोन एक्स्चेंज सेंटर प्रकरणातील मुख्य आरोपी नौशाद अहमद सिद्दिकी (वय ३२, रा. कोंढवा) हा मूळचा उत्तर प्रदेशातील असून, एक वर्षापूर्वी तो पुण्यात वास्तव्यास आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पुण्यात वास्तव्यास येण्यापूर्वी तो ठाण्यात राहत होता. सध्या तो ठाणे एटीएस पथकाच्या ताब्यात आहे. लवकरच पुणे एटीएस त्याला चौकशीसाठी ताब्यात घेणार आहे.

२४ ऑगस्ट रोजी कोंढव्यातील मिठानगरमध्ये दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) छापा टाकून बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या टेलिफोन एक्स्चेंज सेंटरचा पर्दाफाश केला. एटीएसने डीओटीचे अधिकारी व शासकीय पंचांच्या समक्ष ही कारवाई केली. पथकाने तब्बल ३ हजार ७८८ सिमकार्डसह सात सिम बॉक्स, वायफाय आणि सिम बॉक्स चालवण्याकरिता लागणारा अँटिना, तसेच लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत नौशाद याच्यावर कलम ३१८ (४), भारतीय न्याय संहितासह भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५ मधील कलम ४ यांसह द टेलिकम्युनिकेशन ॲक्ट २०२३ चे कलम ४२, तसेच इंडियन वायरलेस टेलिग्राफी ॲक्ट १९३३ कलम ३ व ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दगडूशेठ बाप्पांची ज्ञानराज महाराज माणिकप्रभू यांच्या हस्ते होणार प्रतिष्ठापना

पुणे । प्रतिनिधी

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपतीची शनिवारी (७ सप्टेंबर) कर्नाटकातील हुमनाबाद येथील श्री दत्त संप्रदायाचे ज्ञानराज महाराज माणिकप्रभू यांच्या हस्ते सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी प्रतिष्ठापना होणार आहे. ट्रस्टच्या वतीने साकारण्यात आलेल्या हिमाचल प्रदेशमधील जटोली शिवमंदिराची प्रतिकृतीवरील विद्युत रोषणाईचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याहस्ते याच दिवशी सायंकाळी होणार आहे.





ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी आणि सरचिटणीस हेमंत रासने यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण, उपाध्यक्ष सुनील रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण या वेळी उपस्थित होते. गणेश चतुर्थीला प्रतिष्ठापनेपूर्वी सकाळी साडेआठ वाजता मुख्य मंदिरापासून सिंह रथातून श्रींची मिरवणूक काढण्यात येणार आहे. आकर्षक फुलांचा रथ साकारण्यात आला असून, दोन सिंहाच्या प्रतिकृती रथावर लावण्यात येणार आहेत. प्रतिष्ठापनेनंतर उत्सवमंडपात दुपारी बारापासून भाविकांना गणरायाचे दर्शन घेता येणार आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीचे आकर्षण असलेला श्रीमंत दगडूशेठ गणपती यंदाही अनंतचतुर्दशीला दुपारी चार वाजता लक्ष्मी रस्त्यावरील मुख्य विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणार आहे. भाविकांच्या मागणीनुसार ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी मागील वर्षीपासून विसर्जन मिरवणुकीची वेळ बदलली. पोलीस, प्रशासन, नागरिक, अन्य गणेश मंडळे या सर्वांनाच हा निर्णय पटला. त्यामुळे यंदाही तीच परंपरा कायम ठेवत मानाचे गणपती मार्गस्थ झाल्यावर विसर्जन मिरवणुकीत दुपारी चार वाजता सहभागी होण्याची निर्णय ट्रस्टने घेतला आहे.

# पुणे ते गोरखपूर आता विशेष रेल्वे

पुणे । प्रतिनिधी

प्रवाशांची वाढती गर्दी कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने पुणे ते गोरखपूर दरम्यान विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय घेतला आहे. दिवाळी आणि छठ पूजेच्या काळात ही रेल्वे धावणार असल्याने प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

पुणे–गोरखपूर (गाडी क्रमांक – ०१४३१) ही रेल्वे २५ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान दर शुक्रवारी पुण्याहून दुपारी ४ वाजून १५ मिनिटांनी सुटेल. गोरखपूरला दुसऱ्या दिवशी रात्री ८ वाजून ४० मिनिटांनी पोहोचेल.

गोरखपूर–पुणे (गाडी क्रमांक – ०१४३२) ही रेल्वे २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान दर शनिवारी गोरखपूर येथून रात्री ११ वाजून २५ मिनिटांनी सुटेल. पुण्याला तिसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी पोहोचेल. गाडीला दौंड कॉर्ड लाइन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खांडवा, इटारसी, वीरांगना राणी लक्ष्मीबाई झाशी जंक्शन, ओरई, कानपूर, लखनौ, बाराबंकी, गोंडा, मनकापूर जंक्शन, बस्ती आणि खलीलाबाद आदी स्थानकावर थांबा देण्यात आला आहे.

# बारामतीत भरधाव टेम्पोने १६ वर्षीय मुलाला चिरडलं, संतप्त जमावाने टेम्पो दिला पेटवून

बारामती । प्रतिनिधी

बारामती बारामती तालुक्यात भरधाव टेम्पोने १६ वर्षीय मुलाला चिरडल्याची घटना घडलीये. निरा–मोरगाव रस्त्यावर जगतापवस्ती येथे निरा डाव्या कालव्याच्या वळणावर आयशर टेम्पोने एका १६ वर्षीय मुलाला चिरडल्याची घटना घडली. यामध्ये या मुलाचा जागीच मृत्यू झालाय. मुलाच्या मृत्यूनंतर संतप्त जमावाने टेम्पो पेटवून दिलाय. या अपघातात नीरा येथील पोकळे वस्तीत राहणारा इजाज खुर्शीद सय्यद याचा मृत्यू झालाय. अपघातानंतर संतप्त जमावाने हा आयशर टेम्पो पेटवून दिलाय. त्यामुळे काही काळासाठी या भागातील वातावरण तणावपूर्ण



झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान वडगाव पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत जमाव शांत केला.

दरम्यान, बारामतीत १६ वर्षीय मुलाला टेम्पोने चिरडण्यात आल्यानंतर संतप्त जमावाने टेम्पो पेटवून दिला. त्यानंतर टेम्पो जवळपास जळून खाक झालाय. अग्निशामक दलाकडून टेम्पोला लागलेली आग विझवण्याचे प्रयत्न सुरु आहेच. घटनास्थळी अग्निशामक दल दाखल झाले आहे. टेम्पो पेटवून दिल्यानंतर काही काळ या भागात तणाव निर्माण झाला होता.

# रिक्षा चालकाने केला शाळकरी मुलीचा विनयभंग, पुण्यातील घटना

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात रिक्षाचालकाने शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. रिक्षा चालवत असताना पुढे आरशात पाहत होता त्यावेळी तू मला आवडते, पळून जाऊन लग्न करू म्हणत रिक्षाचालकाने शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याची माहिती समोर आली आहे.

तू मला आवडते. आपण पळून जाऊन लग्न करू, असे म्हणत रिक्षाचालकाने शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला, या घटनेनंतर पालकांनी संताप व्यक्त केला आहे. ही घटना पर्वती परिसरातील जनता वसाहत परिसरात घडली आहे. याप्रकरणी रिक्षाचालका विरुद्ध पर्वती पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मुलीच्या आईने पर्वती पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

पोलिसांना दिलेल्या फिर्यादीनुसार, रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिलेची मुलगी शाळेतून रिक्षाने घरी निघाली होती. त्यावेळी रिक्षाचालकाने आरशातून मुलीकडे एकटक पाहून तिला इशारा केला. त्यानंतर मुलगी पुन्हा शाळेत निघाली. तेव्हा रिक्षाचालकाने तिचा पाठलाग केला. मुलीला जनता वसाहत पोलिस चौकीसमोर काही अंतरावर अडवलं. रिक्षाचालकाच्या त्रासामुळे घाबरलेल्या मुलीने या घटनेची माहिती आईला दिली. त्यानंतर रिक्षाचालकाविरुद्ध विनयभंग, तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला.

# हर्षवर्धन पाटील यांनी भाजपच्या अधिवेशनाला मारली दांडी

दौंड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय पक्षांच्या घडामोडींना मोठा वेग आला आहे. गेल्या काही दिवसांपासून हर्षवर्धन पाटील नाराज असल्याचे समजत आहे. त्यातच आता निमंत्रण देऊनही आजच्या भाजपच्या दौंडमधील जिल्हा अधिवेशनाला हर्षवर्धन पाटील यांनी दांडी मारली. यामुळे आता राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.



दौंडमध्ये भाजपचं जिल्हा अधिवेशन भरवण्यात आलं होतं. या अधिवेशनाला मोठ्या संख्येनं स्थानिक पदाधिकारी आणि नेते उपस्थितीत होते. या अधिवेशनाचे हर्षवर्धन पाटील यांनाही निमंत्रण देण्यात आलं होतं. मात्र तरीदेखील हर्षवर्धन पाटील यांनी या अधिवेशनाला दांडी मारली. भाजपचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे यांनी हर्षवर्धन पाटलांना निमंत्रण दिल्याचे समोर आले आहे. या अधिवेशनाला आमदार राम शिंदे, राहुल कुल, योगेश टिळेकर हे नेते उपस्थित होते.

### हर्षवर्धन पाटील 'तुतारी' फुंकणार?

भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाऊ शकतात, अशा चर्चा मागच्या काही दिवसांपासून सुरू आहेत, त्यातच शरद पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्यात झालेल्या भेटीमुळे या चर्चांना आणखी उधाण आलं आहे. त्यामुळे आता हर्षवर्धन पाटील येत्या विधानसभा निवडणुकीत तुतारी हातात घेणार का? हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र बंद होता कामा नये–चंद्रकांत पाटील

पुणे । प्रतिनिधी

'समाजात माहितीच्या अधिकार कायद्याच्या आधारे 'हे बंद करा, ते बंद करा' असे करायला लावणारे लोक आहेत. पुण्यात उभारलेले 'आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र' बंद होता कामा नये. कोणाचीही दादागिरी येथे चालणार नाही. कोणी त्रास दिला, तर आम्ही खमके बसलो आहोत. आम्ही चळवळीतून आलो आहोत. त्यामुळे 'हे कसे सुरू झाले, हे कोठून आले', 'हे कसे काय, ते कसे काय, याचे उत्तर द्या' हे चालणार नाही,' असे परखड मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनएसडीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन येथे उभारलेल्या 'आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्रा'चे उद्घाटन शनिवारी झाले. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ.



विनोद मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, एनएसडीसी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष नितीन कपूर, सल्लागार मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप सिंग कौरा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, 'विदेशात नोकऱ्या मिळविण्याचे 'एम्लॉयमेंट एक्स्चेंज म्हणून आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र उभारले आहे. यामध्ये राज्यातील तरुणांना विदेशात नोकरी करण्याची संधी हवी आहे. त्या पार्श्वभूमीवर विदेशात नोकरी मिळवून देण्यासाठी आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण आणि नोकरी मिळवून देण्यासाठी हे केंद्र कार्यरत असेल. युरोपसह अनेक देशात कौशल्याधारित काम करणाऱ्या मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. युवकांना परदेशात नोकरी आणि रोजगार देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे.'

केसरकर म्हणाले, ''विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय विद्यार्थ्यांमधील कौशल्य 'अपग्रेड' करण्यासाठी नियम आखण्याची गरज आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. विद्यार्थ्यांना कौशल्यांचे प्रशिक्षण देताना त्याबाबत काही मानके निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच संबंधित देशाचे मूलभूत ज्ञान असणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने पावले उचलली जात आहेत.'' यावेळी डॉ. गोऱ्हे यांनीही विचार मांडले.

'एनएसडीसीचे अनेक देशांशी सामंजस्य करार केले असून कौशल्यप्राप्त युवकांना परदेशात पाठविण्यासाठी सर्व सहकार्य एनएसडीसीमार्फत केले जाते. पुण्यातील केंद्रात फूट लॅब, ब्यूटी अँड वेलनेस, लँग्वेज लर्निंग यासाठी स्वतंत्र प्रयोगशाळा स्थापन केल्या आहेत. याशिवाय केंब्रिज युनिव्हर्सिटीचे भाषा विषय केंद्र देखील येथे असेल, असे संदीप सिंग कौरा यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमात डॉ. मोहितकर यांनी प्रास्ताविक केले.

# बँक ऑफ बडोदा मधील सहायक व्यवस्थापकाला मारहाण; नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

लोणी देवकर (ता. इंदापूर) येथील बँक ऑफ बडोदा शाखेमध्ये सहाय्यक व्यवस्थापकाला गावातीलच तरुणांनी मारहाण केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी इंदापूर पोलीस स्टेशन येथे नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश कडाकणे असे मारहाण झालेल्या बँकेच्या सहाय्यक व्यवस्थापकाचे नाव असून सागर थोरात, निखील थोरात, सुरज थोरात, शुभम थोरात, महेश थोरात (सर्व रा. लोणी देवकर ता. इंदापुर) यांचेसह इतर चार अनोळखी व्यक्ती असे एकूण ९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बँक ऑफ बडोदा लोणी देवकर शाखेचे शाखाधिकारी मनोज बाळासाहेब भोसले यांनी दिलेल्या फिर्यादीनुरुप शुक्रवार (ता. ३० ऑगस्ट) रोजी नेहमीचा बँक ग्राहक असलेला सागर नवनाथ थोरात हा त्याच्या पत्नीच्या बँक खात्यातील नाव दुरुस्तीसाठी पत्नी व मुलीसोबत आला होता.

त्यावेळी फिर्यादी भोसले यांनी त्यांची कागदपत्रे तपासली व त्यानंतर सहकारी महेश कुमार अय्यर यांचेकडे पुढिल कार्यवाही करीता पाठवली. तेव्हा सागर थोरात हा दारू पिल्याचा वास येत होता व तो दारूचे नशेत मोठमोठ्याने बोलत पत्नीच्या नावाची दुरूस्ती आत्ताचे आत्ता करून द्या, नाहीतर मी तुमचे बँकेतील संगणक व इतर साहित्याची तोडफोड करेल असे बोलुन वाद घातला.

यावेळी शाखेतील सहाय्यक व्यवस्थापक गणेश कडाकणे हे त्यांचा वाद सोडवण्यासाठी गेले असता त्यांचेशी देखील वाद घालुन शिवीगाळ करून बाहेर जाताना गणेश कडाकणे यांना 'तु बाहेर ये तुझ्याकडे पाहुन घेतो' तुझे हातपाय तोडतो, अशी धमकी देवुन निघुन गेला. दरम्यान सायंकाळी बँक शाखेतील कामकाज आटपुन बंद करून घरी जाताना सागर थोरात, निखील थोरात, सुरज थोरात, शुभम थोरात व महेश थोरात व इतर साथीदारांनी गणेश कडाकणे यांना मोटारसायकलवरून खाली उतरावुन लाथबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर दुसऱ्या मोटारसायकलवर बळजबरीने बसवुन पळसदेवचे दिशेला नेत त्या ठिकाणी लाकडी काठीने, लोखंडी रॉडने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास इंदापूर पोलिस करीत आहेत.